

# श्री साईलीला

डिसेंबर किं. ५० पैसे १९६८

# या अंकांत—

१ सुवर्णमहोत्सवाची फलश्रुति
२ श्रीसाईबाबा आणि चमत्कार
३ श्रीसाईबाबा अधिष्ठान
४ श्री. पागे यानी घडविलेलें विश्वरूप दर्शन
५ श्रीसाईमहात्म्य ( एकांकिका )
६ सहकाऱ्यांबद्दल कृतज्ञता व आभार प्रदर्शन
७ नामदेवांची अमृतवाणी
८ महात्मा गांधींची अहिंसा
९ सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी
१० सुवर्णमहोत्सवी प्रकाशनें



# श्री साईवाक्सुधा

अन्नदानाचें पुण्य फार मोठे आहे. कोणीही दुपारच्यावेळी भुकेनें व्याकूळ होऊन आपल्या दारीं येवो. तो कुत्रा असो, गाढव असो कीं मानव असो. त्याला अन्न देऊन प्रथम त्याचा आत्मा संतुष्ट करावा व मग, आपण खावें. जें त्या प्राण्यास दिलें तें भगवंतास पावलें. पुण्यपावन झालें. साईबाबांचें अशा गोष्टीकडे फार बारकाईनें लक्ष असे. आपल्या भक्तांस तशी जाणीव ते वेळोवेळीं देत असत. व स्वतःही तसें आचरण करीत असत. मी निरनिराळ्या रूपांनीं या जगांत वावरतों. मुंगी असो, मांजर असो, कुत्रा असो कीं डुकर असो; तीं सारीं माझींच रूपे आहेत. त्यांना दिलेलें मला पावन होतें असें ते सांगत.

—श्रीसाईचरित्र


श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] डिसेंबर १९६८ [ अंक ९ वा

: संपादक :

**श्री. द. दि. पाटणकर**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख सह)

**टे. नं ४४३३६१**

: कार्यालय :

**साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,**

**प्लॉट नं ८०४ बी, दादर, मुंबई १४.**

# सुवर्णमहोत्सवाची फलश्रुति

प्रियवाचक—

श्रीसाईबाबांचा सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथ्युत्सव यशस्वी रीतीनें पार पडला. शिरडी व मुंबई येथें साईबाबांचे असंख्य भक्त त्यासाठीं मनापासून झटले. प्रत्येकानें आर्थिक, शारीरिक व बौद्धिक मार्गानें जो जो सहकार देतां येईल तो तो दिला व म्हणूनच एवढें घवघवीत यश मिळविणें शक्य झालें.

श्रीसाईबाबांच्या जीवनकार्याचा प्रचार करण्याची आतां जरूरी राहिलेली नसली तरी तो या उत्सवामुळें आपोआप व स्वयंस्फूर्तीनें झाला. लक्षावधि लोकांना भक्तिगंगेंत अवगाहन करतां आलें. हें जें घडलें तें बाबांवरील निष्ठेमुळें व त्यांच्या प्रेरणेमुळें घडलें. तसें नसतें तर पन्नास वर्षांपूर्वी ज्यानीं महासमाधि घेतली, त्यांच्या जीवनकार्यांत इतक्या वर्षांनतर आजही इतका जिवंतपणा आढळून आला नसता.

आपण सर्वांनीं मिळून बाबांचा महोत्सव शक्य तेवढ्या समारोहानें साजरा केला. परंतु उत्सव साजरा करणें एवढेंच कां आपलें साध्य होतें ? उत्सव साजरा करणें ही महात्त्वाची गोष्ट नाहीं तर त्या उत्सवांतून ज्या महाभागाचा आपण उत्सव करतों त्याच्या जीवनकार्याला सर्वार्थानें पोषक व चालना देणारी अशी कार्यनिर्मिती झाली पाहिजे, तरच त्या उत्सवाचें महत्त्व व साफल्य.

या उत्सवामुळें वर म्हटल्याप्रमाणें कांहीं लहानथोर भक्तांची सेवा सत्कारणीं लागली. बाबांच्या नांवाचा सर्वत्र जयजयकार झाला. कांहीं प्रकाशनें बाहेर पडलीं व आणखीही कांहीं गोष्टी घडल्या, परंतु साईबाबांच्या जीवन-कार्याच्या किंवा अवतार कार्याच्या दृष्टीनें ज्याला चिरंतन महत्त्व आहे व सध्या-च्या काळांत ज्याची फार जरूरी आहे अशा प्रकारचें कार्य यापुढील काळांत अधिकाधिक प्रभावीपणें सतत चालू रहाणें व त्याला व्यापक स्वरूप येणें जरूर होतें.

साईबाबांचें आवडतें कार्य कोणतें ? जनता सुबुद्ध झाली पाहिजे. लोकांतील परस्पर बंधुभाव वृद्धिंगत होत गेला पाहिजे. जनता शारीरिक व आर्थिक दुःखांतून व अडचणीतून मुक्त झाली पाहिजे. जनतेच्या ठायीं माणुसकी निर्माण होऊन तिला सुखासमाधानांत दैनंदिन जीवत कंठणें शक्य झालें पाहिजे. एवढेंच नव्हे तर तिला परमार्थ साध्य करण्याची ओढ लागली पाहिजे.

साईबाबांनीं जीवनभर हेंच कार्य परोपरीनें पार पाडिलें.जनतेच्या शारीरिक, आर्थिक नि पारलौकिक कल्याणाची त्यानीं अहर्निश काळजी बाळगली. त्यांच्या प्रेरणेनें ठिकठिकाणी व तुरळक प्रमाणांत यथाशक्ति हें कार्य चालू असलें तरी यापुढील काळांत त्या कार्याला सुसंघटित व्यापक नि वैभवशाली स्वरूप येणें जरूर आहे. बाबांचें कार्य म्हणजे मानवतेचें व मानवाच्या सर्वांगीण उन्नतीचें कार्य. तें पार पडतां यावें या सद्धेतूनें बाबांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी निमित्त श्रीसाईबाबा फाउंडेशन ही जबाबदार संस्था स्थापन झाल्याचें जाहीर करण्यांत आलें.

आमच्यामतें सुवर्णमहोत्सवाची सर्वांत महत्त्वाची कोणती फलश्रुति असेल तर ती हीच होय. या निर्मितीचें महत्त्व नि माहात्म्य कोणत्या शब्दांनीं वर्णन करावें हें समजत नाहीं. थोर, माननीय त्याचप्रमाणें जबाबदार व्यक्ति या कार्याशीं निगडीत झाल्या आहेत त्या उगाच नाहीं. त्यानीं बाबांच्या जीवनाचें महत्व बरोबर ओळखलें आहे. त्यांना हें कार्य आत्यंतिक जिव्हाळ्याचें वाटतें. लहान थोर साईभक्तांनीं त्याचप्रमाणें ज्यांना आपल्या देशबांधवांची सर्वांगीण उन्नति व्हावी असें वाटतें, अशा सर्वांनीं या फौंडेशनला आर्थिक हातभार लावून बाबांचें भूतदयेचें व जनता कल्याणाचें कार्य यापुढीस काळांत जास्तींत जास्त फोफावत जाईल असें करावें व ते करतील अशी चालकांची अपेक्षा आहे.

ज्याप्रमाणें सुवर्णमहोत्सव, साईबाबांनीं आपल्या सर्व भक्तांचें सहकार्य मिळवून देऊन यशस्वी केला तेच बाबा आपल्या भक्तांना जरूर ती प्रेरणा देऊन त्यांच्या सहकारानें आपलें हें मानव कल्याणाचें कार्य अपेक्षित यशस्वी रीतीनें पार पाडवून घेतील, याबद्दल आम्हांला तिळमात्रही शंका वाटत नाहीं

# श्री साईबाबा आणि चमत्कार

लेखक : श्री. त्रिभुवन तिवारी, एम. ए. एल्. एल्. बी

मध्यप्रदेश सरकारचे दुय्यम सचीव श्री. त्रिभुवन एस्. तिवारी हे एक साईभक्त असून गेल्या सुवर्ण महोत्सव प्रसंगीं शिरडी येथील साईमंदिरास भेट देऊन व त्यांची भक्तिभावपूर्वक पूजाआर्चा करून गेले. साईलीलेच्या विशेषांकांत ( आक्टोबर ) त्यांचा एक वाचनीय नि उद्बोधक लेख प्रसिद्ध झाला आहे.

त्यानीं श्रीसाईबाबांसंबंधीं सांगितलेल्या कांहीं व्यक्तिगत आठवणी आमच्या वाचकांसाठीं पुढें देण्यात येत आहेत.

श्रीसाईबाबांच्या बाबतींत चमत्कार कसे घडतात यांचा उलगडा भौतिक शास्त्रज्ञांना, ज्ञानवंतांनाही करतां येत नाहीं. तेथें शहाणपण थकतें. शिरडींत या देशाच्या कोनाकोपऱ्यांतून भक्त येत असतात. त्यांपैकीं प्रत्येकाला त्यांचा कांहीं ना कांहीं अनुभव आलेला असतो व त्यांच्या जीवनांत त्यांनीं कांहीं ना कांहीं चमत्कार करून त्यांना थक्क करून सोडलेलें असतें. ज्या गोष्टी सहसा घडूं शकणार नाहींत असे वाटतें, त्या बाबांच्या कृपाप्रसादानें चुटकीसरशीं घडून येऊं शकतात.

सध्यांच्या जगांत बहुजन समाज नाना प्रकारच्या दुःखाने पोळलेला, जीवनकलह भीषण झालेला व एकमेकांबद्दल मत्सर द्वेषभावना यानीं भारावलेला आहे. अशा परिस्थितींत जगायचें कसें हा प्रश्न प्रत्येकापुढें उभा असतो. परंतु अशाही परिस्थितींत साईबाबांचें पुण्यस्मरण तो दुःखभार सुसह्य करणारें आहे, असें वाटूं लागतें. शिरडी येथें त्यांच्या 'समाधिमंदिरांत' सर्व मतांचे नि सर्व धर्मांचे लोक बाबांच्या दर्शनासाठीं येत असतात. तेथें आल्यानें भक्ताला दुःखमुक्तीचा आनंद मिळूं शकतो.

सर्वसाधारणपणें लोकांना लुबाडणारे व दिवसाढवळ्या त्यांची फसवणूक करणारे साधुसंन्यासी, बैरागी यांच्यावर मी विश्वास ठेवत नाहीं. त्यांच्यापासून

नेहमी दोन पावलें दूर असतों. असें असतांही साईबाबांचें जीवनकार्य, त्यांचें जीवन व त्यांची साधीसुधी शिकवण यामुळें मला त्यांचें मनस्वी आकर्षण वाटूं लागलें. भारतांत अनेक संत–महात्मे होऊन गेले व सध्यांही आहेत. त्यांत अनेक कारणांमुळें साईबाबांचें स्थान फार उच्च आहे असे मला वाटते. शांतता पाहिजे. जगांतील सर्वांचें ऐक्य झालें पाहिजे असें ज्यांना मनापासून वाटतें त्यांनीं एक, आदर्श सुधारणावादी या नात्यानें साईबाबांकडे नि यांच्या शिकवणुकीकडे अवश्य लक्ष पुरवावें.

मी मधून मधून शिरडीस जातो आणि जेव्हां जेव्हां मी शिरडीस जातों, तेव्हां तेव्हां कांहीं ना कांहीं चमत्काराची शिदोरी गाठीस बांधून घेऊन येत असतों. मला वाटतें प्रत्येक भक्ताला असा कांहीं तरी अनुभव येतच असेल. थोडक्यात सांगायचें झाल्यास मला आलेल्या अनुभवांचें येथें टांचण केल्यास मी काय म्हणतों, याचा वाचकबंधूंस बोध होईल असें वाटतें.

माझे धाकटे बंधू प्रभाशंकर तिवारी एम्. एस्. (कानपूर मेडिकल कॉलेज) यांची कन्या १९६७ सालीं एकाएकीं अतिशय आजारी झाली. तिला लिव्हरची व्यथा होती. तें वाढलें होतें. तिची आई डॉक्टरीण ( एम. बी. बी. एस्. ) आहे. ती जगणें कठीण आहे असें तज्ञ डॉक्टरांस व तिच्या आईवडिलांसही वाटूं लागलें. शेवटचा इलाज म्हणून माझे बंधू शिरडीला बाबांच्या दर्शनासाठीं गेलें व येतांना बरोबर ‘ उदी ’ घेऊन आले. ती उदी ते त्या मुलीस तीन वर्षे सतत देत होते व रोज तीन तास एकांतीं बसून साईबाबांचें ध्यान करीत असत. शेवटीं ती असाध्य ठरलेल्या रोगांतून पूर्णपणें बरी झाली.

माझा पुतण्या सुशील तिवारी हा कांहीं ना कांहीं कारणामुळें इंजिनियरींगच्या परिक्षेंत नापास होत असे. त्यानें शिरडीला साईबाबांच्या दर्शनासाठीं जाण्याचा व त्यांचें स्मरण करण्याचा उपक्रम सुरू केला. त्यांच्यावरील श्रद्धेमुळें त्याला नंतर प्रत्येक परिक्षेंत यश मिळूं लागलें. शेवटची परिक्षा जवळ आली होती. त्याला तूं अमूक पुस्तक वाच असा एके दिवशीं दृष्टांत झाला. तें पुस्तक त्यानें मिळविलें व अभ्यासिलें. परिक्षेंत त्या पुस्तकांतील प्रश्न आले व तो यशस्वी रीतीनें उत्तीर्ण झाला.

माझे वडील शिवसेवकजी हे ७८ वर्षें वयाचे आहेत. ते माझ्या आई-जवळ दर वर्षी इंदूरहून शिरडीस बाबांच्या दर्शनाशी जातात. त्यांनाही त्यांच्या

आयुष्यांत नाना प्रकारचे व प्रसंगविशेषीं संकटमुक्त होण्याचे प्रसंग अनेक आले. एकदा मी शिरडीहून परत घरीं आलों आणि पहातों तों बाहेर एका कॉटवर कोणी एक साईबाबांसारखे दिसणारे गृहस्थ रामायणांतील श्लोक गात बसले होते. मारुतीरायानें श्रीरामप्रभूचें ऋष्यमुख पर्वतावर स्मरण केलें तेच ते श्लोक होते. श्रीरामाची मी भक्ति करावी असें सूचित करण्यासाठीं बाबानींच ती घटना घडवून आणली असावी. मी विष्णूसहस्रनामाचें पठण करावें असाही एकदां मला दृष्टांत झाला.

पुष्कळ वेळा आम्हीं बाबांपासून ज्याची अपेक्षा करतों तें कदाचित मिळालें नाहीं तरी त्याहीपेक्षा श्रेष्ठ असें कांहीं तरी पदरांत पडल्याशिवाय रहात नाहीं. मला वाटतें बाबांच्या भक्तांनीं आपली जीवन नौका पैलतिरीं नेऊन पोहोंचविण्याची जबाबदारी बाबांवर सोपवून आपण निश्चिंत रहावें म्हणजे बाबाच ती नौका संकटातून पैलतिरावर नेऊन पोहोंचवितील. माझी तरी हीच श्रध्दा आहे.

भारतांत श्रीसाईबाबांसारखे सत्पुरुष अवतीर्ण झाले हें आमचें भाग्य होय. अजूनही त्यांची माहिती नाहीं अशीं कितीतरी माणसें असतील. आजआपणास जागतिक शांतता व सार्वत्रिक बंधुभाव यांची अत्यंत जरूरी आहे. साईबाबांची शिकवण त्यासाठीं पोषक होऊन रहाणारी आहे. त्यांच्या शिकवणीपासून पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा आहे. सर्वांभूती प्रेमभाव, दयाभाव, मानवजातीबद्दल आत्यंतिक प्रेम, या त्यांच्या गुणांमुळें त्यांचें अनुकरण केल्यानें देशाचें कोटकल्याण झाल्याशिवाय रहाणार नाही.

—साईलीला मासिकाचे सहकारी संपादक व सुप्रसिद्ध चरित्र लेखक श्री. पु. बा. कुळकर्णी यांच्या पत्नी सौ. आनंदीबाई ह्या सोमवार ता. १८ नोंवेंबररोजीं श्रीसाईचरणीं विलीन झाल्या हें लिहिण्यास अत्यंत दुःख होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिर शांति देवो.

# श्री. पागे यांनीं घडविलेलें विश्वरूप दर्शन

समीक्षक : **द. मो. चित्रे**

मुंबई विधान परिषदेचे अध्यक्ष श्री. वि. स. पागे यांनीं मुंबईकरांना एक अलौकिक दर्शन घडविलें त्याबद्दल मुंबईकरांतर्फे माझे त्यांना हार्दिक धन्यवाद. नामदार पागेसाहेब यांचा संत वाङ्मयाचा अभ्यास गाढा आहे. संत वचनें त्यांच्या जिव्हेवर सदैव खेळत असतात. अध्यात्मपर संस्कृत वाङ्मयाचा अभ्यासही त्यांनीं सूक्ष्मपणें केला आहे. त्यांच्या मुखांतून बाहेर पडणारी संस्कृत वचनें त्याची साक्ष देतील आणि त्यांच्या ह्या सूक्ष्म अभ्यासाचें फलित म्हणजे त्यांनीं मुंबईकरांना घडविलेलें विश्वरूप दर्शन.

ज्ञानेश्वरीचें लेखन पुरें झाल्यानंतर संत शिरोमणी श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं परमेश्वराजवळ पसायदान मागितलें, "आतां विश्वात्मके देवे । येणें वाग्यज्ञे तोषावे । तोषूनि मज द्यावे । पसायदान हे ॥" प्रतिभा संपन्न कवीची झेप विश्वात्मक देवाकडेच असावयाची. श्रीज्ञानेश्वर महाराज तर संतपण लाभलेले कवि होते. विश्वात्मक देवाकडे ओढ असणें स्वाभाविकच होते. या विश्वात्मक देवाबद्दल पाश्चिमात्य तत्वचिंतक काय म्हणतात तें आपण पाहूं या.

स्पिनोझा देवाबद्दल म्हणतो, "God is the free cause of all active nature" जें जें कांही अस्तित्वांत आहे त्याचें आद्य कारण म्हणजे देव. प्रिस्टले म्हणतो, "Man's soul is entirely dependent on his body and it evolves with it to ever higher states of existence". मानवाचा आत्मा त्याच्या शरीरावर अवलंबून असतो आणि तो वरवरच्या स्तरांवर जाण्याचा सदैव प्रयत्न करित असतो. सुप्रसिद्ध जर्मन कवि गटे आपल्या फॉस्ट ह्या नाटकांत म्हणतो, "दिक्कालाच्या गतिमान अशा हातमागावर विणलेले सजीव वस्त्र ईश्वरानें परिधान केलें आहे." "Goethe in

his Faust describes nature as the living garment of God woven in the roaring loom of time"

हेगेलचें तत्वज्ञान असें सांगतें कीं, "खरी एकात्मता म्हणजे विश्वव्यापक आकर्षण, ज्या आकर्षणांतून वस्तु व जीवमात्र निर्माण होतात आणि शेवटीं ज्यांत विलीन होतात तें आकर्षण. म्हणजेच मानवाला एकमेकाविषयीं वाटणारा जिव्हाळा. मानवतेचा आधारस्तंभ तो हाच." Hegel's theory is that "the ideal unity from which all things proceed and to which all things tend is universal gravitation" हेगेल पुढें असें म्हणतो "No cause, force, quality or Quantity is anything at all apart from the whole to which it belongs" कोणत्याही पदार्थाचें मूळ त्याची कार्यशक्ति, त्याच्या अंगचे गूण किंवा परिणाम हे सर्व तो पदार्थ ज्यांतून निर्माण झाला त्या पदार्थाहून भिन्न नसतात. आजच्या जगांत हेगेलच्या तत्वज्ञानाला फार महत्व आहे. कारण कार्ल मार्क्सचा साम्यवाद हेगेलच्या द्वंद्ववादावर आधारलेला आहे.

शोपेनहारचें म्हणणें असे, "जीवमात्रांतील इच्छाशक्ति त्या जीवाचें जीवन घडवित असते". ऑगस्ट कॉंट म्हणतो, "The idea of fate is a stepping stone from polytheism to monotheism"

दैववाद म्हणजे अनेक दैवताकडून एका देवाकडे वळण्याची पहिली पायरी. ख्रिचन धर्मगुरू प्रार्थना करतांना म्हणतात, "Help me that I may never in any thoughts, words or deeds offend thee and thy Holy law" प्रभो, मला सहाय्यकर. मला कधीही माझ्या वाणीनें अथवा कृतीनें तुझ्यापासून आणि तुझ्या आज्ञेपासून वंचित होऊं देऊं नकोस."

नामदार वि. स. पागे यांनीं हें गूढ तत्वज्ञान भारतीय तत्वज्ञाना-समवेत श्रोत्यांच्या समोर नृत्य, गायन, वादन ह्या स्वरूपांत ठेवलें. त्यांना साथ दिली ख्यातनाम संगितदिग्दर्शक श्री. वसंतराव देसाई यांनीं.

पालखी व दिंडी ही सामान्य माणसांची देवमंदिराकडे जाण्याची परंपरागत साधनें. शतकानुशतके दिंड्यांच्या सुरांत श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या व श्रीतुकाराम महाराजांच्या पालख्या आषाढी व कार्तिकी एकादशीस पंढरपूरास जात असतात. त्यांत हजारो भक्त सामील होतात व आत्मानंदांत बेहोष होऊन विठ्ठल

स्तवन करित असतात. श्रीसाईबाबांच्या पादुकाच्या पालखींतही अशाच आत्मि-यतेनें भक्त रममाण होत असतात. हाच सामान्य जनांचा आपुलकीचा धागा हातांत घेऊन श्री. पागेसाहेबांनीं आपल्या कार्यक्रमाची सुरवात पालखीच्या आग-मनानें केली. भालदार चोपदार यांच्या ललकारांत व भक्तांच्या हरिनामघोषांत भगवंताची पालखी व्यासपीठावर अवतीर्ण झाली. श्रोतृवर्गही स्तवनांत सामील झाला. भक्तीला उधान आलें.

## बाबांचा जयजयकार



मुंबईत सेंट झेविअर क्रीडांगणाच्या मैदानावर स्थापन करण्यांत आलेल्या पादुकामंदिरापुढें भक्तमंडळी भजनंदांत रंगून गेली आहेत.

पण एका भक्ताच्या मनांत आलें देवाचें दर्शन अगोदर कीं देवाचें स्तवन अगोदर. प्रत्यक्ष देवाच्या दर्शनाशिवाय त्याचें स्तवन तरी कसें

परिपूर्ण होणार ? सामान्य माणूस साकाराचेंच पूजन करूं शकतो; निराकाराचें पूजन तो कसें करूं शकणार ? सामान्य जनांना साक्षात्कारी संत श्री तुकाराम महाराज यांनीं मार्ग दाखविला. श्रीतुकाराम महाराज म्हणतात, "देवाचें नांव जिव्हावाटे घ्या म्हणजे तो तुमच्या सन्निध येईल. देवाचें नांव हेंच देवाचें दर्शन." श्री तुकाराम महाराजांनीं देवाचें दर्शन एवढें सुलभ केल्यामुळें लाखो भक्त विठ्ठलाच्या नामसंकिर्तनांत तल्लीन होत असतात.

विरह सहन करणें अशक्य झाल्यामुळें संत मीराबाई नंदकिशोरासी एकरूप झाली. "मीराके प्रभु गिरीधर नागर" हे पालुपद सर्वांच्या ओठांवर सदैव असतें याचें कारण ही तद्रूपता. श्री संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांनीं अशा अनेक विरहिणी आपल्या काव्यसंग्रहांत ग्रथित केल्या आहेत. भक्ताला आपल्या आराध्य देवतेचा विरह सहन होत नाहीं. तो देहभान विसरून आराध्य देवतेचा ध्यास घेतो आणि शेवटीं अगदी तल्लीन होऊन जातो. माननीय पागेसाहेबांनीं अशा तीन विरहिणी नृत्य स्वरूपांत रसिकांना सादर केल्या व एक विरहिणी वाद्यांच्या नाद स्वरूपांत सादर केली. या चारही विरहिणी परमेश्वराकडे दिव्य प्रेमाची याचना करीत होत्या. श्री. वसंतराव देसाई यांच्या मार्गदर्शनाखालीं ह्या विरहिणींनीं आपल्या विरहाचें दुःख आणि शेवटीं मीलनाचा आनंद मूर्त स्वरूपांत प्रेक्षकांच्या समोर सादर केला. प्रेक्षकांचीं अंतःकरणें हेलावलीं. श्री. वसंतरावाना धन्यवाद.

नामदार पागेसाहेबांनीं श्रोत्यांना विरहिणींच्या व्यथेकडे योग्याच्या दृष्टीकोनांतून पाहण्यास सांगितलें. साक्षात्कार होण्याच्या अगोदर योग्याला असंख्य संकटांतून जावें लागतें. निरनिराळ्या आंतरिक स्पंदनांनी त्याचें मन व्यथित होत असते आणि शेवटीं साक्षात्काराचा ब्रम्हानंद त्याला लाभतो. योग्याच्या ह्या सर्व मनोव्यथा व त्याचा ब्रम्हानंद नृत्याद्वारें व स्वराद्वारें साकार करण्यांत आला. रसिक प्रेक्षकांनी आपली अभिव्यक्ति टाळ्या देऊन व्यक्त केली.

ऑक्टोबर दिनांक ११, १२, १३ रोजीं हे कार्यक्रम सादर करण्यांत आले. मध्यंतराच्या १० मिनिटांच्या सुटीनंतर विश्वरूप दर्शनाचा कार्यक्रम सुरू होत असे. तिन्ही दिवस मिळून जवळ जवळ सात तास ह्या कार्यक्रमानें

व्यापले. निवेदनाचें काम स्वतः श्री. पागेसाहेब आपल्या अमोघ व विद्वत्तापूर्ण वक्तृत्व शैलींत करीत. प्रेक्षक वर्गांत पूज्य गोदावरी माताजी, अर्थमंत्री श्री. वानखेडेसाहेब, चॅरिटी कमिशनर श्री. गोडसेसाहेब आदि नामवंत मंडळी होती. सर्वांना हा कार्यक्रम फार आवडला. भगवान् श्री कृष्णानीं यशोदा मातेला दाखविलेल्या विश्वरूप दर्शनाप्रमाणें श्री. पागेसाहेबांनीं मुंबईकरांना घडविलेलें विश्वरूप दर्शन रसिक प्रेक्षकांच्या ध्यानांत सदैव राहील यांत शंका नाहीं. एवढेंच नव्हेतर असें विश्वरूप दर्शन पुन्हां घडवावें अशीच विनंती माननीय पागेसाहेबांना ते करतील. आतां आपण श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या शब्दांत म्हणूं याः

दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणीजात ॥

# मुंबईतील श्रीसाई दरबार

लेखकः-द. मों. चित्रे.

**शिरडीचे** महान् संत श्रीसाईबाबा यांच्या पादुकांचें मुंबईंत झालेलें आगमन म्हणजे मुंबईकरांना एक पर्वणीच होती. जनमानसांत श्रीसाईबाबांचें स्थान अतुट आहे. श्रीसाईबाबांनीं देहस्वरूपांत भक्तांचीं अंतःकरणें जिंकली होतींच. पण देह विसर्जन केल्यानंतर एक नव्हें, दोन नव्हें तर सतत पन्नास वर्षें जनमनावर त्यांनीं अधिराज्य गाजविलें ही गोष्ट लक्षांत आणावयास हवी आणि विशेष म्हणजे जसजशी वर्षांमागून वर्षें निघून जात आहेत तसतशी भक्तांची संख्या भूमिती श्रेणीनें वाढत आहे; आणि तशी वाढतच जाणार ! श्रीसाईनाथाय नमः

पवित्र पादुकांची पालखी शिर्डिहून निघाली आणि वाजतगाजत नाशिक-पर्यंत आली. तेथून रौप्यरथामधून मुबईच्या वेशीपर्यंत आली. असंख्य भक्त-गणांच्या समवेत नामदार पागेसाहेबांनीं व इतर सभासदांनीं त्या पादुकांचें यथोचित स्वागत केलें. ५० सुवासिनींनीं पादुकांना ओवाळिलें. परत पालखी पायीं मार्गस्थ झाली आणि दिंड्या, भजनें, वाद्यें यांच्या गजरांत सेंट झेविअर्स कॉलेजच्या महाद्वारांत प्रविष्ट झाली. त्या ठिकाणीं परम साईभक्त नामदार बाळासाहेब सावंत त्या पादुका शिरीं धारण करण्यासाठी उपस्थित होतेच. पादुकांची विधि-पूर्वक प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली. शिर्डिप्रमाणेंच पूजेचा विधी मुंबईंत सुरूं झाला. दर्शनासाठी भक्तांची रीघ सुरूं झाली. श्रीसाईबाबांचें आगमन दिनांक १० ऑक्टोबर रोजीं रात्रौ ठीक ९ वाजतां झालें.

क्रीडांगणावरील मंडप व्यवस्था उत्तम होती. आंत प्रवेश करतांच डाव्या हाताला द्वारकामाईची स्थापना व त्या लगतच पादुकांचें उच्चासन. दर्शन विना-मूल्य. साई जीवन दर्शन प्रदर्शनाला मूल्य होतें, पण फक्त २५ पैसे. त्याला जोडू-नच आणखी दोन महत्त्वाची प्रदर्शनें होती. एक संतांच्या चित्रांचें प्रदर्शन. यांत जुन्या नामवंत संतांपासून गांधी विनोबा पर्यंत सर्व संत होते; व ते सर्व कालग-णनेनुसार मांडलेले होते. दुसरे, पुस्तकांचें प्रदर्शन. वेद उपनिशदापासून तों तहत् आजतागायत् प्रसिद्ध झालेलें संबध संतवाङ्मय त्यांत होते. प्रका-

शित ग्रंथांचीं भाषा संस्कृत,मराठी,उर्दू, फारशी होती. आशय एकच–विश्वरूप दर्शन, भाषा फक्त माध्यम रूपानें. राष्ट्रीय एकतेला अतिशय पोषक गोष्ट आहे ही. भारत माता की जय.

जाहिर सभेसाठी व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी भव्य व्यासपीठ तयार केलें होतें. श्रोतृवर्गासाठी कोच व खुर्च्या व्यवस्थित मांडल्या होत्या. त्या मागें क्रीडांगणाचा स्टँड होता. या सर्व रचनेमुळें कार्यक्रम उत्तम रीतीनें पहातां येत असे. लाऊड स्पीकरची व्यवस्था उत्तम असल्यामुळें वक्त्यांचे उच्चार व गवयांचे स्वर उत्तम रीतीनें ऐकता येत असत. मंडप रचनाकारांस धन्यवाद.

कार्यक्रम सुरू होण्याच्या अगोदर मंजुळ सनई वादनानें अस्सल भारतीय वातावरण तयार होत असे. जागतिक वाद्यवृन्दाला सनई ही एक फार मोठी देणगी आहे. सनईचे मंजुळ सूर वातावरणांत प्रसन्नता निर्माण करतात. श्रोता उल्हसित वृत्तीनें आनंदास्वाद घेण्यास तयार होतो. गायन हें चित्त स्थिर करण्याचें प्रभावी साधन आहे. शेषशाही भगवान् श्री विष्णू वीणाधारी नारदमुनीवर आकृष्ट झाला, तो उगीच नव्हे. गायनाचा प्रभावच असा आहे.

मुंबईतील साई दरबारची सुरवात अत्यंत औचित्तपूर्ण रितीनें होत असे. वेद म्हणजे भारतीयांचें अमोल धन. वेद काळ म्हणजे आर्य संस्कृतीचा अत्यंत उज्वल काळ. विद्वत्तेच्या क्षेत्रांत पुरुषाबरोबर स्त्रियाही वैभवानें चमकत असत. याज्ञवल्क ऋषीला प्रश्नोत्तरानें अवाक् करणारी गार्गी याच काळांतील. मैत्रेयाही याच काळांतील. याच वारसाचें जतन आजही शिर्डीजवळील साकोरी या गांवी पूज्य गोदावरी माताजी करीत आहेत. त्याना माझे विनम्र अभिवादन. स्त्रियांना वेदपठणाची संथा देणारे भारतांतील एकमेव पीठ म्हणजे साकोरी पीठ. याच पीठांतील त्रयोदश कन्या कार्यक्रमाची सुरवात वेदपठनानें करीत. दिनांक ११ ला ऋग्वेदांतील ऋचा, दिनांक १२ ला यजुर्वेदांतील ऋचा व दिनांक १३ ला सामवेदांतील ऋचा श्रोत्यांच्या कानांवर पडल्या व कान तृप्त झाले. माझें मातीजींना पुनःच अभिवादन. केंद्रिय व महाराष्ट्रीय शिक्षा मंत्रालयांनीं सकोरी विद्यापीठाची दखल घ्यावयास हवीच हवी. स्त्रियांद्वारें वेदपठण अविरत सुरू राहिले पाहिजे.

साकोरी कन्यांनीं निर्माण केलेल्या प्रसन्न वातावरणांत भजनाला सुरवात होत असे. कलाकारामागून कलाकार श्री साईबाबांच्या दरबारांत हजेरी लावण्यासाठी अहमहमिकेनें पुढें येत असत. मन्ना डे, नीलाक्षी जुवेकर, सुधा मलहोत्रा, वसुधंरा कोमकली,शंकर शंभू,श्री व श्रीमति पांडुरंग दिक्षीत सी.रामचंद्र,सौ.सुहासिनी मुळगांवकर, उस्ताद अलिम जाफर खान, झरिना दारूवाला, गोपीकृष्ण आदि कलाकारांनीं आपापल्या कला श्री साई चरणीं रुजू केल्या. तंतुवादन, गायन, नृत्य यांनीं क्रीडांगणाचें वातावरण भक्तिभावानें धुंद होत असे. दिनांक ११ ऑक्टोबर १९६८ ते दिनांक १५ ऑक्टोबर १९६८ पर्यंत हे कार्यक्रम होत.

हे झाले रात्रौ ९ नंतरचें कार्यक्रम. सकाळीं ८ वाजतां वेदपठण, सायंकाळीं ४ वाजतां प्रवचन व भजन. हे सर्व विधी शिर्डीप्रमाणे येथेंही होत असत. पहाटे काकड आरति व रात्रौ शेज आरतीही होत असे. श्री साईबाबांच्या पादुकांच्या दर्शनासाठी रांगा लागणें अपरिहार्य होते. दिनांक १३ म्हणजे तर रविवार सकाळीं८ वाजेपासून मध्यरात्री पर्यंत मैदान भरलेले होते. श्री साईबाबांच्या कृपेनें सर्व कार्यक्रम, दर्शनाचे सुद्धां शिस्तींत व व्यवस्थित पार पडले. स्वयंसेवक, होमगार्डस् व पोलीस यांना धन्यवाद. चुकलेलीं मुलेंही पालकांच्या स्वाधीन करण्यांत आली. श्रोतृवर्गाला कलाकारांचा परिचय करून देण्याचें काम सौ. सुहासिनी मुळगांवकर यांनीं उत्तम रितीनें केलें. संस्कृत व मराठी भाषा यावर प्रभुत्व व आवाजाची देणगी या गुणसमुच्चयांनीं सौ.सुहासिनीताईंनीं आपली कामगिरी पार पाडली. त्यांना धन्यवाद. श्री वसंतराव देसाई यांचे आभार जेवढें मानावें तेवढें थोडेच आहेत; कारण ते तर सर्व कार्यक्रमाचे सूत्रधार

# श्री साईबाबा अधिष्ठान

"जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारे" । "जें कां रंजलें गांजलें । त्यासि म्हणे जो आपुलें" । श्री तुकाराम महाराजांनीं संतांचें अवतार कार्य काय असतें तें स्पष्टपणें निर्दिष्ट केलें आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, रुग्ण सेवा, दुःखिताना दिलासा, भक्तांना अभय हें कार्य श्रीसाईबाबा यांनीं आयुष्यभर केलें. समाधि घेतल्याला ५० वर्षं उलटूनही हें त्यांचें कार्य अविरत

---

## दोन साईभक्त



*

इंदूरचे माजी न्यायमूर्ति श्री. बाळासाहेब रेगे व मद्रासकडील साइभक्ति प्रचारक श्री. बशीर बाबा या दोन्हीं थोर भक्तांचा परिचय गेल्या अंकांतून करून देण्यांत आला आहे.

*

---

चालू आहे. हें कार्य चिरस्थायी स्वरूपांत करणें ही बाबांच्या भक्तांची जबाबदारी.. श्रीसाईबाबा फाउन्डेशनची स्थापना याच कामासाठीं.

दिनांक १४ ऑक्टोबर १९६८ हा जाहीर सभेचा दिवस. श्री साईबाबा

यांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले न्यायमूर्ति बाळासाहेब रेगे हे अध्यक्षपद विभूषित करण्यासाठी व श्री साईबाबा अधिष्ठानची प्राणप्रातिष्ठा करण्यासाठी लाभले हें महत् भाग्य होय. श्री साईबाबा अधिष्ठानची मूळकल्पना चॅरिटी कमिशनर श्री. गोडसे यांची. कोर्ट रिसीव्हर श्री. पाटणकर यांनी ही कल्पना विश्वस्तांसमोर ठेवली. सर्वांनीं ह्या कल्पनेचा आनंदानें स्वीकार केला. न्यायमूर्ति रेगे यांनीं या कल्पनेंत प्राण ओतले व ती मूर्त स्वरूपांत जनता जनार्दनासमोर ठेवली. भारतभर व भारताबाहेर विखुरलेले श्री साईबाबांचे लाखो भक्त श्री साईबाबा फाउन्डेशनला आपलासा मानतील यांत शंकाच नाहीं. श्री साईबाबांना प्रथम मन हवे असते; नंतर अर्थ आपोआपच उभे राहाते.

भजन,पूजन, मूकस्तवन याचा मुख्य उद्देश चित्तशुद्धि हा असतो. चित्तशुद्धि वाचन, मनन, चिंतन यांना अतिशय उपयुक्त असते आणि याची परिणति समाजसेवेंत व्हावयास हवी. समाज सेवा हीच ईश्वर सेवा. व्यक्ति आणि समाज यांचे संबध अन्योन्य आहेत. व्यक्ति उन्नत झाली की समाज उन्नत होतो. समाज उन्नत करणे हें साई अधिष्ठानचें एकमेव कार्य आहे. न्यायमूर्ति रेगे यांनीं पुण्याशिर्वाद दिलेले व श्री साईबाबा यांचें नांव धारण करणारे श्री साईबाबा अधिष्ठान आपलें नांव सार्थक करील यांत शंकाच नाहीं. नामदार वानखेडेसाहेब यांच्या नेतृत्वाखाली विश्वस्त मंडळ स्थापन झालें आहे ही एक उचित घटना आहे. समाज सेवा हीच ईश्वर सेवा या तत्त्वावर आधिष्ठित झालेले श्री साईबाबा अधिष्ठान ही आजच्या काळाची नितांतांत गरज आहे. श्री साई तमसो मा ज्योतिर्गमय ।

Lead me on from darkness to light oh Sai

---

# श्रीसाईमाहात्म्य

[ एकांकिका--पूर्वार्ध ]

लेखकः- बाळ ज. पंडित, एम्. ए. एल्‌एल्. बी.

शिरडी गावांतील प्रमुख रस्ता. गावकऱ्यांची आपापसांत कुजबूज चालू आहे.

"राम राम"

"राम राम"

"काय रं परवांचा त्यो चिमत्कार ऐकला कां ?"

"कोणता बाबा ?"

"अरं त्यो—त्या साईबाबाचा–ईश्वराचा अवतार म्हनतात त्येला."

"मंग काय त्याचं ?"

पहिला : अरं त्यो चांदभाई हायना–त्यो बा लई काही तरी सांगीत होता.

दुसरा : काय, काय, सांगत व्हता तो ?

पहिला : एकदम् इलक्षण–चिमत्कार झाल्याचं सांगत व्हता तो.

दुसरा : अरं पण–काय त्ये तर सांगशील ?

पहिला : त्याला म्हने काल रानात साधुबाबा भेटला होता.

दुसरा : आणि मंग?

पहिला : साधुबाबा म्हंजे अक्षी साधुबाबा, अगदीं परत्यक्ष परमेश्वरच म्हणाना !

दुसरा : अरं पण त्यानं केलं तरी काय ? चांदभाईन त्येला कसं उलखल ? हें तर सांगशील झटपट ?

पहिला : अरे तेच तर सांगतो मी.

दुसरा : मंग सांग की बिगी बिगी.

पहिला : हां हां–सबुर जरा–हॉ- तर काय सांगत व्हतो–तो साधुबाबा म्हंजे

परमेश्वर हाये–आर त्यांन रानात चुकली फसलेली घोडी कुठं चरत होती ती बरोबर सांगितलन !

दुसरा : चांदभाईची घोडी ना ? मग चांदभाई विसरला असेल अन घोडी गेली असेल त्याची नजर चुकवून–

पहिला : अरं छाऽऽ–धूप–गावचं दाट जंगल ठाव हाये ना तुला ? इतक दाट जंगल कुणी कधीं पाह्यलं हाय ? त्यांत चुकली व्हती घोडी. चांदभाई वण वण फिरला बिचारा. जंग जंग पछाडलं त्यांन घोडीसाठी–पर न्हाय; साऱ्या जागा धुंडाळून घोडीचा थांगपत्ता कसा त्यो लागलाच नाय त्येला.

दुसरा : मंग ?

पहिला : मंग काय–फिरता फिरता त्येला त्यो साधुबावा दिसला. ह्या भल्या मोठ्या झाडाखाली–ध्यान लावून बसला व्हता. चांदभाई त्याच्याजवळ गेला अन् त्यानं साधुबाबाला नमस्कार केला. साधुबाबाच्या सारं लक्षात आलं. अन् त्यानं लगेच सांगितलं " अरं, कुठं उगाच भटकतोस–ती समोरच्या झाडीत तुझी घोडी चरत बसली आहे बघ !

दुसरा : खरं ? साधुबाबांन कांहीं माहित नसताना सांगितलं ?

पहिला : मंग काय खोटं सांगतो व्हय मी ? नुस्ता चेहरा पाहून शान ताडलं त्यानं ! हाय् की नाय् लई इलक्षण ?

दुसरा : हां हाये खरं बा. पर काय र त्यानं एकदम् उळखलं ? चांदभाईनीं त्याला काही न सांगता ?

पहिला : अरं काय खुळा का काय तूं ? मंग आता तुला काय सांगितलं मी ? चांदभाई तर अक्षी चाटच पडला बघ ! त्यानं रानांत जाऊन बघितलं तर ती घोडी कशी सुखात चरत होती तिथं ! त्यानं धरून तिला आणलं आपल्याबरोबर !

दुसरा : मंग हा चिमत्कार हाये खरा !

पहिला : यात काय प्रश्न हाये ? अरं त्याची त्या साधुबाबाची, दुसरी मजा सांगतो.

दुसरा : दुसरी मजा ? म्हणजे दुसरा चिमत्कार ? ऐकावं तें तें नवलच बुवा.

पहिला : हो हो दुसरा चिमत्कार.

दुसरा : सांग सांग, गड्या तु लौकर––

पहिला : चिलीम ओढण्याचा नाद हाये त्येला. पण रानात जवळ निखारे कुठून आले ? धूप–गांवचं रान तें ! मंग काय गंमत केली त्यानं माहित हाये ?

आपला चिमटा, आपटला…… …जमिनीवर–आन्–अरं पाह्यतूस काय येड्यावानि माझ्या तोंडाकडं ? अरं त्या चिमट्यातून निखारे निघाले–हाये ठाऊक ?

दुसरा : अरं बापरं ! मंग त्या बाबाचं दरसन् घेतलंच पाहिजे. कुठं हाये त्यो ? आपल्या शिरडी गावाला येणार हाये की नाय् त्यो ?

पहिला : अरं येणार म्हंजे काय येणारच !

तिसरा : प्रवेशून–अरं बसलात काय असे गप्पा छाटीत ? उठा–उठा. साईबाबा येणार आहेत गावात आज !

पहिला व दुसरा : साईबाबा – कोण साईबाबा ?

तिसरा : अरं त्या चांदभाईचा त्यो साधुबाबा !

पहिला व दुसरा : केव्हां येणार ? कधी येणार ? कुठून येणार ? कसा येणार ? सांग सांग.

तिसरा : हा म्हंजे काय तो आलाच हाये शिरडी गांवाला !

पहिला व दुसरा : ( आश्चर्याने ) आं ? असं ? आला—आले साईबाबा इथं ?

तिसरा : हा म्हंजे त्याचं असं झालं की चांदभाईच्या आग्रहामुळं तो चांद-भाईच्या घरी गेला. आन् लग्नाच्या वऱ्हाडासंगं इथं शिरडीला आला. पर झाली काय पग मधी मजा, त्याला खंडोबाच्या देवळामधी आडवलं ! पर देवळाचा मालक त्यो म्हाळसापती–सोनार हाये ना–लई मोठा माणूस–त्याला बराबर समजतं कोण साधु पुरुष–आन् कोन् चोर त्यें–त्यानं साधुपुरुषाला मोठा मानुस म्हून ओळखलं !

पहिला व दुसरा : आन् मंग–?

तिसरा : मंग काय–सहज त्याचे तोंडांतून शब्द निघाले–" आवो साईबाबा " त्या साधुबाबाला उद्देशून ! मंग साऱ्यांनीच जयजयकार केला " जय साईबाबा " ! ( एवढ्यांत पाठीमागून जयजयकार ऐकू येतो. ) " जय साईबाबा "–( चवथा व पाचवा सांगत येतो )–" साधुबाबा आले. साईबाबा आले. "…. " आले साधुबाबा, आले साईबाबा. "

….आणि खरंच शिरडीत साईबाबा आले….

इतके दिवस कोपरगांवच्या कुशीवर डोकं टेकून शिरडीगांव पहुडलं होतं. त्यांत चैतन्य कसं ते मुळींच नव्हतं. पण आज साईबाबा

आल्यानं गांवात एक प्रकारची जागृति आली. गांव खडबडून जागं झालं! भक्तांना भक्तिस्थान सांपडलं. निंदकांना निंदास्थान सापडलं. पण त्यामुळे एवढं झालं की सर्वांच्या मुखी साईबाबांचं नांव खेळतं राहिलं. जो तो कुहतूलानं साईबाबांची चौकशी करी. त्यांचे विषयींच बोले. बाबांचे चालणे कसे आहे, वागणे कसे आहे, बोलणे कसे आहे, कपडे कसे आहेत यावरच चर्चा चाले. टिंगल करणारे टिंगल करीत. पापभिरू धार्मिक लोक बाबांशी आदरानं वागीत. त्यांना प्रेमभरानं मानीत. वंदत–भजत–पूजीत.

अंगांत पांढरी शुभ्र कफनी व डोक्याला पांढरा रुमाल–मागील बाजूला भली मोठी गाठ घालून गुंडाळलेला–—हा बाबांचा वेष. अगदी साधा! किंचित् मुसलमानी धाटणीचा! हिरव्या किंवा भगव्या रंगाची कफनी ते घालीत–पण ते भक्तांच्या इच्छेखातर. आवड म्हणून नव्हे. सकाळ संध्याकाळ निंबवृक्षाखालीं बसायचं. भर-दुपार झाली कीं हातांत एक पत्र्याचे जुनाट टमरेल घेऊन व मळक्या फाटक्या कापडांची चौपदरी करून झोळीत भिक्षा मागायची हा त्यांचा नेम असे. उरलेला वेळ ते लेंडीबागेत घालवीत. ही बाग स्वतः पाणी घालून त्यांनींच लावली होती. घागरीतून पाणी त्यांनींच घातलं होतं! पानं, फुलं, रोपटीं, आणि फळं त्यांनीच वाढवून मोठी केली होती....

**'फाटकें तुटकें नेसतो रे। मन मानेल तेथें बसतो रे।**
**वेड्या वेड्या परी दिसतो रे। परि ब्रह्मांड गिळून असतो रे।"**

अशी त्यांची कृति असे. कांही कांही वेळा ते भ्रमिष्टासारखे वागत. कुठंहि भटकत. ओढ्यावर भटकत, नाहीतर लहर लागली तर आकाशाकडे एकसारखी दृष्टि लावून ध्यानमग्न होऊन जात! या त्यांच्या चाळ्यामुळें त्यांना काही अश्रद्ध लोक "वेडे फकीर" म्हणत. मात्र बाबांच्या समर्थपणाची व आध्यात्मिक उंचीची ज्यांना कल्पना होती ते त्यांना असे कधीच म्हणत नसत. उलट बाबांना फार मान देत. त्यांची सेवा करण्यांत ते मग्न होऊन जात. धार्मिक लोक त्यांची वडिलांप्रमाणें सेवा करीत. तर काही वृद्ध बाया त्यांना आईप्रमाणे ममतेनं वागवीत.

× × ×

( साईबाबा झाडाखालीं ध्यानात बसलेत. बायजाबाई – वृद्धबाई समोर उभी )

बायजाबाई : अरं बाबा–कितीं अंत पहाणार माझा? चल् चल् खा घासभर! नको भटकूं उन्हातान्हातून, किती वेळ उपाशी राहाणार? हे अन्न आणलंय्, तुझ्यासाठीं मी !

साईबाबा : अग, पण त्ये मी तुला आनायला सांगितलं का?

बायजाबाई : न्हाय रं बाबा! पर तु न्हाई सांगितलं म्हून मी आनायचंच न्हाई का? तू थकला भागला हायेस. पोटांत अन्न न्हाई तुझ्या, म्हून आनलं मी.

साईबाबा : माझ्या पोटांत अन्न नाही अन् त्याची तुला काळजी !

बायजाबाई : अरं होय रं. तू जगाची काळजी करणार आन् तुझी काळजी कुनी करायची? खा बाबा, जीव कसा तट् तट् तुटतो तू खाल्लं नाहीस तर.

साईबाबा : माझ्यासाठीं तुझा जीव तुटतो?

बायजाबाई : तुझा जीव लोकांसाठीं तुटतो ना? तसा माझा तुझ्यासाठी तुटतो?

साईबाबा : हूं !

बायजाबाई : कसं सांगू तुला बाबा? या इतक्या जंगलातून, मी तुझ्यामागून ही चटणीभाकरीची टोपली घेऊन वणवण येते ती उगाच वाटतं रं?

साईबाबा : पन् त्यो तर तुझाच हट्ट? खरं कीं नाहीं?

बायजाबाई : अरं बाबा, बरं माझा हट्ट! अरं तुला न्हाय कुणी. बाबा साई– अरे, तू माझ्या पोटच्या पोरासारखाच वाटतोस रे मला!

साईबाबा : असं?

बायजाबाई : होय रे होय. कधी कधी तू ओढ्यापाशी समाधी लावून बसतोस.

साईबाबा : अन त्यावेळीं माझी वाट पाहात तूं ताटकाळत बसून राहतेस, असंच की नाही?

बाजयाबाई : तसं नव्हं रं! मी माझच न्हाई सांगत - - - - साई – अरं देवा तू साऱ्या जगाला उळखतोस. अन् मला उळखलं नाहीस अजून?

साईबाबा : तसं कसं म्हणूं मी?

बायजाबाई : तुझ्याजवळ राहाण्यानं मंग माझीही समाधि लागते. किती आनंद वाटतो मला. माझी दुःखं मी विसरून जाते. तुला जेऊं घालायचे एवढेंच मग मला माहीत असते.

साईबाबा : ( थोडं थांबून ) खूप त्रास देतो नाहीं तुला मी? मला ठाऊक आहे.

बायजाबाई, मला ठाऊक आहे. माझ्यासाठीं तूं मैलन् मैल तुडवीत राहातेस अनवाणी. सतत. आणि खाण्याचा आग्रह करतेस फार फार---- स्वत: न खाता मला आग्रह – किती कष्ट घेतेस तूं!

बायजाबाई : असं बोलायचं नसतं तूं बाळ. अरं कितीक वेळां तूं जेवत नाहींस हें पाहवते कां मला? समोर दिसला कुत्रा कीं वाढ त्याला पोळी भाकरी – असं चाललेलं असतं तुझं. अन्–तुझ्या समोरचं अन्न तुला नकळत लोक पळवतात–आन् तरीबी तूं काय बोलत नाहीस. नुसता हंसतोस आणि उपाशी राहातोस.

साईबाबा : अग पण ती पोरंबाळं– आया बायका देखील उपाशीच असतात!

बायजाबाई : पण तुझी वाट काय? तू कां जीवाचं हाल करून घेतोस? मी सारं पाहते हे. म्हून आपलं थोडसं आनते तुझ्यासाठीं. आन तूं तर घेत नाहीस. तें काही चालायचं नाहीं. आज तूं खाल्ली पाहिजेस माझीच भाजी-भाकर हं. आतां काय बी बोलूं देणार नाय मी तुला. नाहीं तर रागावेन हं मी – चल. आटप – बैस जेवायला – खा पटापट.

साईबाबा : आन् तूं?

बायजाबाई : अरं, तू खाल्ल्यावर माझं पोट आपापच भरेल बरं!

साईबाबा : बायजाबाई, ओळखल मी. लपवूं नकोस कांही. मी खाल्ल्याबिगर तूं कांहीं बी खात नाहींस. उपाशीच राहतेस. काय म्हणू मी तुला माउली आहेस तूं माउली.

बायजाबाई : आहे नं माउली? धन्य झाले मीं आज! पावला मला तुझा आशीर्वाद. अरं पन तूं तर अजून कांहींच खात नाहींस. हं. जेव. मीच घालते घास घास तुला. – खाशील? कसा खात नाहींस तेच पाहतें!

( साईबाबा जेवतात )

\+ + + +

वाणी एकत्र जमतात व आपापसांत हितगुज करतात

पहिला : हं काय कसं काय हो मंडळी कशा करिता बोलवणं केलंत आम्हाला?

दुसरा : कशा करता म्हंजे– आज येईल तो वेडा फकीर!

तिसरा : येईल म्हणे काय येईलच.

पहिला : मग?

दुसरा : मंग काय ? काय ठरवायचं ?

तिसरा : काय ठरवायचं असेल ते ठरवा पण तें सर्वानी पाळा.

पहिला : तें खरच आहे.

दुसरा : त्यांत काय शक आहे ? सर्वांनीच पाळलं पाहिजे तें. नाहीतर त्यांत काय आहे मजा ?

तिसरा : बाकी त्या बाबाचा हा त्रास रोजचाच झाला आहे. तो त्रास बंद केलाच पाहिजे. ना पैसा ना कांही. आपलं कां नुकसान करून घ्या ? काय रे ?

दुसरा : कसं बोललास ? परं काय रे त्याला ही काय खोड ? तेल घ्यायचं फुकटचं–पणत्या लावून टाकायच्या द्वारकामाईत–आणि बघत बसायचं त्याच्याकडे एकटक शिळेवर बसून ?

तिसरा : अहं–त्ये एक खूळ हाये. बरं थांबा, साईबाबाच येतो आहे इकड सबूर हं....( साईबाबा येतात )

साईबाबा : ओ वाणीबा–तेल द्या तेल.

दुसरा : तेल कसलं तेल. तेल बिल काही मिळायचं नाही इथं !

साईबाबा : अरं वाईच पणतीभर. तुमी ओ वाणीबा ?

तिसरा : छे छे, तेल बिल कसलं मागतो इथं ?–आणी पैसे ?

साईबाबा : कुठून आणू बाबांनो पैसे इथं

तिसरा : मग तेल कोठून आणू इथं– साईबाबा–महाराज ?

साईबाबा : अच्छा– जैसी आपकी मर्जी

पहिला : गेला बिचारा बाबा इथून निघून.

दुसरा : कुठे जाणार हा ?

तिसरा : कुठं काय, आपल्या मशीदींत ! चुकलेला फकीर कुठं जातो ? तिथं ! आतां ह्येला कांही कोणी तेल देणार नाय !

पहिला : कायरं ? आपुन केलं तें चांगलं कीं खराब ?

दुसरा : खराब कसलं ? सर्वांनीं मिळून ठरवलय् ना आपण ? पैसा नाही मिळत, तर काय करायचं ?

तिसरा : नाहीं तर काय ?

पहिला : पण काय रे, आपण द्वारकामाईंत गेलो तर ? तो आज काय करतो तें तर पाहूं.

दुसरा : हां हां, चला पाहू........पर कशाला उगीच ?

तिसरा : अरं चऽल. जाऊ या कीं; आपल्याला कोण बंदी करणार ? बघूं तर कसे आज दिवे लावतो द्वारकामाईंत ते ? रोज दिवे लावायला पाहिजेत ? फुकटच्या तेलाने !

( सर्वजण द्वारकामाईंत जातात. )

पहिला : अर त्यो बगा त्यो. च् च् ते बघा साईबाबा........

दुसरा : काही तरी पुटपुटतो आहे.

तिसरा : अन् कसा अगदीं विचार केल्यावानी दिसतोया. पर मान खाली घालून बसलाय बघा कीं, तेल नाही तर लात्र म्हणावं आता दिवे.

पहिला : अर, असं नका बोलू. त्यो लई मोठा मानूस हाये. चला बघूं, आपण देऊ त्याला तेल, बिचारा.

दुसरा : अर, थांब र ! आपन् का त्याचा अपमान करतोय् कां टाकुन बोलतोय ? पैसे दिले नाहीत म्हणूनच ना तेल देत नाही ?

तिसरा : अर त्यो बगा उठला त्यो. अर बाबा, आमीं बी तुला मानतो पर पैसे ? एकदम् झटक्यानं उठला बगा त्यो........

पहिला : आता काय करणार साईबाबा ?

दुसरा : बगूं तर खरं !

तिसरा : पण त्या पणतीकडेच चालला आहे त्यो. गोळा करतोय जनूं ! आँ—गोळा भी केल्या इतुक्यांत. आता काय करत्यो त्यो ? बघा हं गूपगूप ....अर बगा तर खर मजा ! टमरेलांतलं पाणी पिऊन टाकलं त्यानं ? वेडा फकीर उगाच म्हणतात व्हय त्येला ? आता काय ? अर त्या टमरेलात पाणी पुन्हा ओतलं हाये त्यानं ! अन् त्येच पानी समद्या पनत्यातून घालतुया जनूं ! आन् त्यो समद्या वाती बी पेटवून देतोय की— काय पण शहाण-पणा पाहा, कसा तेल नाहीं तर पाणी टाकून पणत्या पेटवतोय ! अरं बाबा ! पर कशा पेटतील त्या ? एवढं कसं न्हायं कळत ? पाणी म्हंजे काय तेल हाये होय ? तेल तें तेल !

पहिला : अरं बगतोस काय वेड्यासारखा---चूप बैस. साऱ्या पणत्या पेटल्यात बघा !

दुसरा : अरं खरंच की !

तिसरा : त्यो कोण देव हाये?

पहिला : अरं बघ बघ डोळे फाडूनशान. अरं साईबाबा म्हंजे मोठा मानूस हाये.

तिसरा : हाये बाबा, पणत्या पेटवल्यान् खरं. परं चिमटा घे बगू मला. मला तर डोळ्यावर विश्वासच ठेववत नाहीं बघ !

पहिला : आता तर सगळ्या पणत्या चांगल्या पेटल्यात. द्वारकामाईतले सगळे दिवे लागलेत. चांगला प्रकाश पडतोय त्यांचा ! पाण्यांत वाती ठेऊन सुद्धां प्रकाश पडतो आहे त्यांचा !

दुसरा : कबूल, कबूल !

तिसरा : आरं खरं रे खरं !

पहिला : अरं, मोठा गुन्हा केला अपुन. असं करू नये हे पहिल्यापासूनच मला वाटत होतं ! चला, चला, आपण त्याचे पाय धरू. क्षमा मागूं. अरं त्यो तर साक्षात् देवच दिसतो कीं ! लोक म्हणतात् ते काय खोटं हाये व्हय रे ?

दुसरा : चल, चल, चुकलं आपलं....

तिसरा : खरंच आपलं चुकलंच. कान धरून नाक घासलं पाहिजे आतां. आपण येला तेल दिलं पाहिजे—नेहमी करतां बरं....

सगळा गाव द्वारकामाईपाशी लोटतो. लोकांना खरं कांय घडलं हें कळतांच ते आश्चर्यानं थक्क होतात. पटापट लोक बाबांच्या पायाशीं लोटांगण घालण्यासाठीं जातात.

पहिला : बाबा चुकलं आमचं. तुम्हाला आम्ही तेल नाकारलं. आता असा गुन्हा कधीं करणार नाय्. क्षमा करा बाबा.

दुसरा : बाबा—खरोखरच तुम्ही आमच्या डोळ्यात झणझणीत तेल घातलंत. खरोखरंच तुम्ही प्रकाश दाखवला आज आम्हाला ! आम्हाला माफी करा. पश्चाताप होतोय आम्हाला.

( पुढील अंकीं समाप्त )

# सहकाऱ्यांबद्दल कृतज्ञता व आभारप्रदर्शन

**श्रीसाईबाबांचा सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथ्युत्सव शिरडी व मुंबई येथें यशस्वी रीतीनें पार पडला. अनेकांनीं भक्तिभावपूर्वक दिलेल्या सहकारामुळेंच हें यश मिळवितां आलें. शिरडी संस्थानचे माननीय रिसिव्हर श्री. द. दि. पाटणकर यांनीं उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं अत्यंत कृतज्ञतापूर्वक सर्वांचे आभार मानले. त्यांच्या त्या भाषणाचा सारांश पुढें देण्यांत येत आहे—**


साईभक्त हो,

ता. २३ सप्टेंबरपासून तों आज ता. १५ आक्टोबरपर्यंत शिरडी व मुंबई येथें श्रीसाईबाबांच्या सामाधीचा जो सुवर्णमहोत्सवाचा सोहळा चालू होता त्याची अत्यंत यशस्वी रीतीनें आज सांगता होत आहे. आजचा त्या महोत्सवाचा शेवटचा दिवस असल्यामुळें निरनिराळ्या क्षेत्रांतील ज्या लहानथोर साईभक्तांनी हा उत्सव सर्वपरीनें यशस्वी व्हावा म्हणून रात्रंदिवस आपल्या जिवाचें अक्षरशः रान केलें त्यांच्याबद्दल कृतज्ञतेचे चार शब्द याठिकाणीं बोलणें हें माझें कर्तव्य आहे. या उत्सवास असंख्य लोकांचा हातभार लागलेला आहे. त्या सर्वांच्या मागें श्रीसाईबाबांची प्रेरणा होती. त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या अपरंपार भक्तिभावामुळें निरनिरळ्या क्षेत्रांत वावरणारी मंडळी एकत्र आली.

प्रथमारंभीं ज्यांना या उत्सवाचे मूळ कल्पक, सूत्रधार व मार्गदर्शक म्हणतां येईल, अशा थोर व माननीय गृहस्थांचा येथें सादर उल्लेख केला पाहिजे. या उत्सवामागची ती थोर व्यक्ति म्हणजे एक प्रेरक शक्ती होती. आरंभापासून शेवटपर्यंत ती शक्ति आमच्या पाठीशीं होती व आमच्याकडून कार्य करवून घेत होती. ती थोर व्यक्ति म्हणजे आपल्या राज्याचे माननीय चॅरिटी कमिशनर श्री. गोडसे हेच होत. बाबांची त्यांच्यावर कृपादृष्टि आहे असें म्हटल्याशिवाय माझ्यानें रहावत नाही. शिरडी संस्थानचा रिसिव्हर या नात्यानें गेल्या दीड वर्षापासून त्यांच्याशीं माझा संबंध जडला असला तरी या महोत्सवाच्या निमित्तानें गेल्या एक वर्षापासून मी त्यांच्या निकट सहवासांत आलों आणि त्यामुळें त्यांच्या स्वभावाचे अनेक उज्ज्वल

पैलू मला पहातां आले. या महोत्सवाची मूळ कल्पना त्यांची व ती गेल्या दीड दोन वर्षांपासून त्यांच्या डोक्यांत घोळत होती. सुवर्णमहोत्सव आणि तोही साई-बाबांसारख्या महापुरुषाचा उत्सव साजरा करावयाचा ही एक भव्य कल्पना होती. आमचे गोडसे साहेब केवळ कल्पना देऊन थांबले नाहींत तर तो यशस्वी रीतीनें पार पडावा यासाठीं जें जें करणें अत्यावश्यक तें पार पाडवून घेण्यांत त्यांनीं जरासुद्धां कसूर केली नाहीं. चॅरिटी कमिशनर या नात्यानें त्यांचा अनेक संस्थांशी

## प्रेरक शक्ति



सुवर्ण महोत्सव समीतीचे सन्मानीय अध्यक्ष व महाराष्ट्राचे अर्थमंत्री ना. एस. के. वानखेडे ब शिरडी संस्थानचे रिसीव्हर व प्रमुख कार्यकर्ते श्री. द. दि. पाटणकर

व ट्रस्टशीं संबंध येतो; परंतु शिरडी संस्थानवर त्यांचा विशेष लोभ व भक्ती आहे. गेल्या एका वर्षांत या उत्सवाच्या निमित्तानें त्यांच्या भेटीगांठीचे अनेक प्रसंग आले. सर्वच गोष्टी त्यांच्या म्हणण्याप्रमाणें होत होत्या असें नाहीं; परंतु

प्रत्येक वेळीं प्रत्येक प्रश्नाचा शांतपणें विचार करून त्यानीं समाधानकारक निर्णय द्यावा व कार्यकर्त्यांस विश्वासांत घेऊन त्यांना प्रोत्साहन द्यावें हें त्यांचें नेहमींचें धोरण होतें. कधींही कोणाला दुखवायचें नाहीं हें होतें त्यांचें त्यांच्या नावाप्रमाणें गोडसें धोरण. माझ्या पाहाण्यात तरी असा विचारी, प्रत्येकास संभाळून घेणारा व जरूर तें कार्य हंसत खेळत करवून घेणारा अधिकारी आलेला नाहीं. थोडक्यांत सांगायचें झाल्यास मी असें म्हणेन कीं त्यांच्यासारख्या अधिकाऱ्यांच्या हाताखालीं काम करण्याची आम्हांला संधी मिळाली ही बाबांची कृपा होय. त्यांच्याबद्दल कितीही कृतज्ञता व्यक्त केली तरी ती थोडीच होणार आहे.

एकंदर कार्य सुकरतेनें पार पडावें यासाठीं अर्थमंत्री ना. वानखेडे यांच्या अध्यक्षतेखालीं एक कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें व अनेक पोटकमिट्याही निवडण्यांत आल्या. श्री. वानखेडे, ना. पी. के. सावंत, श्री. पागे, श्री. भारदे या सर्वांना साईबाबांबद्दल आत्यंतिक प्रेम व आदर आहे. श्री. पागे व श्री. भारदे हे तर अध्यात्माचे व संतवाङ्मयाचे गाढ अभ्यासी आहेत. आपल्यामागे अनेक जबाबदाऱ्या व कामें असतांही ही सर्व थोर मंडळी सवडीनुरूप सभांना हजर राहून जरूर तें मार्गदर्शन करीत असत. विशेषतः माननीय पागेसाहेब यांचा या कार्यांत फार उपयोग झाला आहे. त्यांनीं जो सहकार दिला आहे तो आपण पाहिला आहे. याबद्दल त्याना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच होतील.

कमिटीच्या सभेंत आरंभींच एक महत्त्वाचा निर्णय घेण्यांत आला. व त्या कल्पनेचे कल्पक माननीय श्री. गोडसे हेच होत. साईबाबा फाऊन्डेशन हें साईबाबांचें लोककल्याणाचें व सध्यांच्या काळांत अत्यावश्यक वाटणारे कार्य यापुढील काळांत पार पाडण्यासाठीं अस्तित्वांत आलें आहे. बाबांचे परम भक्त व ज्यांनी त्यांच्याबरोबर ७।८ वर्षें राहून त्यांची कृपा संपादन केली असे सुवर्णमहोत्सव समारंभाचे माननीय अध्यक्ष इंदूरचे माजी न्यायमूर्ती श्री. बाळासाहेब रेगे यांनीं आपल्या संस्मरणीय अध्यक्षीय भाषणांत साईबाबा फाऊन्डेशनला आपले अंतःकरणपूर्वक आशीर्वाद देऊन हें कार्य सर्वतोपरी यशस्वी व्हावें, यासाठीं बाबांची प्रार्थना केली आहे. मला वाटतें यापुढील काळांत आपण सर्व कार्यकर्त्यांनीं त्या कार्यास सर्वस्वीं वाहून घ्यायवाचें आहे. सचिवालयांत बसून या महोत्सवाची योजना व आखणी करण्यांत आली. तेथें योजना

आखल्या जातात परंतु त्या पार पडण्यासाठीं त्यांच्यामागें वरपासून खालपर्यंत फार मोठी खोल पाळेमुळे असलेली मानवी यंत्रणा तयार असते. तशी यंत्रणा आमच्याजवळ नव्हती; त्यामुळे या योजना कार्यान्वित कशा होणार, याची चिंता वाटत होती. परंतु ती चिंता बाबांच्या भक्तांनी एकत्र येऊन लवकरच दूर केलीं; तसेंच त्यांनी वारंवार सभा घेऊन कामाची वाटणी करून घेतली.

या उत्सव कार्यांत आम्हांला अनेकांचें सहकार्य मिळालें. कालच्या सभेंत त्यांचा आभारपूर्वक उल्लेख करण्यांत आलेला आहेच. गेल्या कांहीं दिवसांपासून माझ्या सभोंवार अनेक माणसें रात्रंदिवस वावरत होतीं. या उत्सवाच्या यशाचे ते सर्वजण भागीदार आहेत. मी एकटा किंवा कोणीही एकटा दुकटा कांहीं करूं शकत नाहीं. त्याच्या पाठीशीं मनुष्यबळ असावें लागतें. बाबांच्या कृपेनें तें मला मिळालें. त्यांपैकीं कांहीं नावांचा मी येथें केवळ ओझरता, परंतु अंतःकरणपूर्वक उल्लेख करीत आहें.

रावसाहेब थोरात. मुख्य उत्सव कमिटीचे एक सभासद. यांना आपण सर्व ओळखतां. सर्व उत्सवांत पाठच्या भावाप्रमाणें ते माझ्याबरोबर निःस्वार्थपणें वावरत होते. त्यांना बाबानीं कांहीं कमी केलेलें नाहीं. खुशाल आरामांत बसून खावें; परंतु तें सर्व बाजूला ठेऊन रावसाहेब या उत्सवांतील सर्व दिवसांत, जणूं काय आपल्या घरचेंच कार्य आहे या नात्यानें आपलेपणानें वावरले. त्यानीं वेळ काळ कांहीं पाहिलें नाहीं. त्यांचें सारें लक्ष बाबांचा हा सुवर्ण महोत्सव मोठ्या थाटांत पार पडला पाहिजे,याकडेच होतें. त्यांचे किंवा आपले तरी आभार मी कोणत्या शब्दांनीं मानूं? मला यावेळीं एक गोष्ट आठवते. रावसाहेब थोरात हे या उत्सवाची सुरुवात होण्यापूर्वी हृदयविकारानें आजारी पडले. काहीं दिवस हॉस्पिटलांत पडून होते व घरीं आल्यानंतर त्यानीं महिना दोन महिने स्वस्थ विश्रांति घेणें जरूर होतें. परंतु साईबाबांच्या कार्यापुढें त्यानीं विश्रांतीची तमा बिलकूल बाळगली नाहीं. आले ते कामाला लागले! त्यांचे आभार कोणत्या शब्दांनीं मानावे हेंच समजत नाहीं. मी एवढेंच म्हणेन कीं, बाबांनीं त्यांच्यावर कृपेचा वर्षाव करून त्यांना निरामय, निरोगी व सुखासमाधानाचें दीर्घायुष्य द्यावें.

या उत्सवांत अनेक कलावंतांनीं आपला निःस्वार्थ सहकार दिला. त्यांत

प्रामुख्यानें श्री. वसंतराव देसाई, पांडुरंग दीक्षित, सी. रामचंद्र आणि या सर्वांचे साथीदार तसेंच चित्रकार श्री. पेडणेकर, दलाल, ब्लॉकमेकर श्री. नेरॉय यानींही आपापली कला बाबांच्या चरणीं अर्पण केली आहे. या सर्वांना धन्यवाद.

रावसाहेबांच्या पाठोपाठ श्री. सीताराम धानू आणि त्यांचे बंधू यांचा उल्लेख असाच प्रेमादरभावानें करावासा वाटतो. बाबांचे तेही एकनिष्ठ आत्यंतिक भक्त आहे. त्यांची बाबांवर किती अपरंपार भक्ती आहे त्याचा प्रत्यय उत्सवांत आला. त्यानी ही जी सेवा केली ती अत्यंत प्रशंसनीय आहे. बाबांच्या पादुका थाटामाटांत आणण्यासाठीं त्यानीं स्वतःच्या खर्चानें एक जीप विकत घेतली व स्वतःच्याच खर्चानें तिच्यावर सुंदर साजशृंगार चढविला. या कार्यांत त्यानीं आमच्याकडून कशाचीही अपेक्षा केली नाहीं. आपल्या धंद्याकडेही दुर्लक्ष करून चोवीस तास बाबाची सेवा-भक्ति केली ! सौ. धानू तर पालखीबरोबर चालत आल्या. केवढा हा त्यांचा अनन्य भक्तिभाव ! बाबा त्यांना त्यांच्या व्यवसायांत उत्तरोत्तर वाढतें यश व बरकत देवोत, हीच प्रार्थना.

या ठिकाणीं मी कोणाकोणाचा साभार उल्लेख करूं ? श्री. श्रीपतराव जाधव, श्री. जहांगीर करंजीया, श्री. पुरुषोत्तम व सौ. तोळानी, श्री. जाधव मास्तर, माधवराव आर्टिस्ट, पांडुरंग दीक्षित हे असेच निस्वार्थ भक्त आहेत. कुमारसेन समर्थ, पेडणेकर, स्वयंसेवक प्रमुख चव्हाण, माने, समेळ, सावंत श्री.व सौ. प्रभू, पवार, तातू देशपांडे, तळगोरी आर्टिस्ट, नागेशराव सावंत, डॉ. गवाणकर, अनंतनाथ महाराज (जैन मंदिर) डी.डी.नेरॉय, आर्टिस्ट दलाल, असंख्य स्वयंसेवक व सेविका या सर्वांचे मी आभार मानतों व साईबाबानीं त्याना सुखासमाधानाचें दीर्घायुष्य द्यावें अशी त्यांची प्रार्थना करतों

शिरडीहून नाशीक व नाशीकहून मुबईस बाबांच्या पादुका आणण्याच्या कामीं अनेकांचा हातभार लागला. ठिकठिकाणच्या भक्तांनीं पालखीचा किंवा पादुकाधारी जीपचा प्रवास सुखाचा व्हावा यासाठीं जो सहकार दिला तो देणाऱ्या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतों.

साईभक्त हो ! हें आभाराचें पुराण मी आतां संपवीत आहें; परंतु तें संपविण्यापूर्वीं मला मनापासून सर्वांना एक विनंती करावयाची आहे. शिरडी

किंवा मुंबई येथील उत्सवांत अजाणतेपणीं आमच्याकडून चुका घडल्या असतील, उणा पुरा शब्द गेला असेल. एवढें मोठे कार्य ! त्यांत चुका न घडल्या तरच नवल ! किंवा विस्मरणामुळें कोणाचा नामोल्लेख करायचा राहिलाही असेल, तो बुद्धिपुरस्सर घडलेला नाहीं, असें समजून आपण सर्वांनीं उदार अंतःकरणानें क्षमा करावी.

सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी निमित्तानें आपण सर्वजण एकत्र आलों. एकमेकांना प्रेमळ सहकार दिला व भक्तिभावानें बाबांचा उत्सव पार पाडला, आयुष्यांत अशा सेवेची संधी क्वचित्‌च येत असते. आमच्या व आपल्या महत् भाग्यानें ती वाट्यास आली ही आपण बाबांची कृपा समजूं या व यापुढेंही बाबांनीं अशीच संधी वेळोवेळीं देऊन यापेक्षा आपलें मोठे कार्य करवून घ्यावें अशी त्यांच्या चरणीं प्रार्थना करूं या.

पुन्हां एकवार आपणा सर्व भक्तांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून मी माझें भाषण संपवितों.

# नामदेवांची अमृतवाणी

अनुवादकः—गणेश विष्णु कविटकर,
एम्. ए.

## सर्वव्यापी ईश्वर

राग आसा

एक अनेक बिआपक पूरन जत देखउ तत सोई ॥
माइआ चित्र बचित्र विमोहित बिरला बूझै कोई ॥
सभु गोबिंदु है सभु गोबिंदु है गोबिंदु बिनु नही कोई ॥
सुतु एकु मणि सत सहंस जैसे ओति पोति प्रभु सोई ॥
जलतरंग अरु फेन बुदबुदा जलते भिन्न न कोई ॥
इहु परपंचु पारब्रह्म की लीला बिचरत आन न होई ॥
मिथिआ भरमु अरु सुपनु मनोरथ सति पदारतु जानिया ॥
मुक्ति मनसा गुरु उपदेसी जागत ही मनु मानिआ ॥
कहत नामदेऊ हरि की रचना देखहु रिदै बिचारी ॥
घट घट अंतरि सरब निरंतरी केवल एक मुरारी ॥

अर्थ—ईश्वर एक आहे. तो अनेकत्वानें विचरत आहे. तो सर्वव्यापक आहे. तो पूर्ण आहे. जेथें पाहावे तेथे तो आहे; पण चित्रविचित्र मायेनें मोहित झाल्यामुळें ही गोष्ट थोडेच जाणतात. सर्व ठिकाणीं गोविंद आहे. गोविंदाशिवाय जगांत दुसरें कांहीं नाहीं. एकच सूत्र असून त्यांत हजारो मणी ओवावे तसा ईश्वर सर्वत्र ओतप्रोत भरलेला आहे. पाण्यावरील तरंग, फेस व बुडबुडे हे पाण्या-हून भिन्न नाहींत. संसार ही परब्रह्माची लीला आहे. विचार केल्यास परब्रह्माहून वेगळी वस्तु नाहीं, हे लक्षांत येईल. खोटा भ्रम आणि स्वप्नवत् मनोरथ या सत्य वस्तु असे मी समजलों, परंतु गुरूंनीं मनांत निर्वाण पदाचा, मुक्त होण्याचा

उपदेश केला कीं, जग हा मनाचा संकल्प आहे. नामदेव म्हणतात, हरीची सृष्टि-रचना पहा आणि मनांत विचार करा. प्रत्येक वस्तूमध्यें एकच मुरारी निरंतर वास करीत आहे.

**( १ ) एक अनेक बिआपक पूरक**

एक तूं अनेक अनेकीं तूं एक —नाम०

**( २ ) सभु गोबिंदु, सभु गोबिंदु है—**

गोविंद हें नाम जनीं जनीं दिसे —नाम०

**( ३ ) मिथिआ भरमु अरु सुपनु मनोरथ—**

स्वप्नाचिया परी देखसी आभास —नाम०

**( ४ ) जागत ही मनु मानिआ—**

मनो विजृम्भणमिदं संसार इति संज्ञितम् ।

—योगवासिष्ठ

( केवळ मनाची कल्पना हेच संसाराचें रूप )

**( ५ ) घट घट अंतरि सरब निरंतरी केवळ एक मुरारी ॥**

( अ ) अणुरेणुमात्रीं व्यापूनि राहिला —नाम०

( ब ) नामा म्हणे हरी सबाह्य भरला ।

भरोनि उरला दाही दिशा —नाम०

# महात्मा गांधीजींची अहिंसा

लेखक : लक्ष्मीकांत भा. मंत्री

**चालू वर्ष हें राष्ट्रपिताजी महात्मा गांधी यांच्या जन्म-शताब्धीचें वर्ष आहे. अशावेळीं त्या पुण्य पुरुषाच्या शिकवणुकीचें मनन करावें असें कोणाला वाटणार नाहीं ? या लेखांत श्री. लक्ष्मीकांत मंत्री यानीं महात्माजीनीं मानवी जीवनांत अहिंसेला महत्त्वाचें स्थान कां दिलें, याचें सुंदर स्पष्टीकरण केलें आहे.**

'महात्मा गांधीजींची अहिंसा' समजण्यासाठीं प्रथम महात्माजींचें जीवनविषयक तत्त्वज्ञान समजून घेतलें पाहिजे. येथें तत्त्वज्ञान हा शब्द गूढ अर्थीं वापरला नसून एखाद्या व्यक्तीचा जीवन-दृष्टिकोन याच अर्थीं घेणेचा आहे. 'आत्मसाक्षात्कार अगर मुक्ति' हेंच महात्माजींनीं आपल्या जीवनाचें ध्येय मानलें होतें. त्याच्या जीवनांतील प्रत्येक कृति मग ती अस्पृश्यता निवारणासारखी असो, समाजसुधारणेची असो, अगर राजकीय पेंचप्रसंगांत आत्मशुद्धीसाठीं केलेल्या उपवासाची असो, या सर्वांचें लक्ष्य एकच असे; तें आत्मसाक्षात्कार अगर मुक्ति. आत्मसाक्षात्काराची अगर मुक्तीची व्याख्या महात्माजींनीं आपल्या आत्मकथेच्या उपसंहारांत केली आहे. या चराचराला व्यापून उरलेल्या सत्यनारायणाची जीवनांत अनुभूति घेणें ह्याच आत्मसाक्षात्कार होय. हा साक्षात्कारः—

जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत ॥

अशा प्रेममय भावनेंतून होणार आहे. अशा प्रेमाचा विकास विकारापासून मुक्तता जसजशी होत जाईल तसतसा होत जातो. अतः विकारापासून मुक्ति करून घेण्याचा प्रयत्न हीच जीवनसाधना होय.

जैनधर्मग्रंथांतही अहिंसेची व्याख्या रागद्वेषादि विकारांपासून मुक्तता अशी आहे. पहाः—

अप्रादुर्भावः खलु रागादीनां भवत्यहिंसेति
तेषामेवोत्पत्तिः हिंसेति जिनागमस्य संक्षेपः ॥ पु. सि. ४४

रागादि विकारांपासून मुक्तता कां करून घ्यावयाची ? रागादि विकार हे निसर्गतःच मानवी स्वभावांत आहेत;मग मानवी जीवनाचें तत्त्वज्ञान त्यांच्यापासून मुक्तता कां करून घ्यावी असें म्हणतें ? प्राकृतिकवाद्यांचा दावा आहे कीं ह्या निसर्ग–प्रवृत्ति दूर करण्याच्या प्रयत्नांमुळें मानवी जीवन दुःखी झालें आहे. कित्येक बांधव मानसिक रोगानें पछाडिले आहेत. म्हणून मानवी जीवन दुःखी करणारें तत्त्वज्ञान आम्हाला नको. आम्हांला रागादि विकारांना दूर करणाऱ्या तत्त्वज्ञानापेक्षां रागादि विकारांची व्यवस्था लावून व्यक्तित्व संघटित करणारें तत्वज्ञान–जीवन दृष्टिकोन–पाहिजे असें ते म्हणतात.

न जातुः कामः कामानामुपभोगेन शाम्यति।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥ १ ॥

असें कारण सांगितल्यानें समाधान होत नाहीं. महात्माजी म्हणतातः— 'मन हें बिनबुडाचें भांडें आहे. त्यामध्यें उपभोगरूपी पाणी कितीही भरलें तरी तें रिकामें रहाणार आहे. त्यामुळें वासनापूर्तीच्या मार्गे मानवानें धावूं नये. भगवान बुद्ध म्हणतात–"वासना ही सर्व दुःखांचें मूळ आहे. वासनांपासून मुक्तता हेंच निर्वाण !" परंतु शास्त्रीय मताला न पटणाऱ्या ह्या गोष्टी आहेत. वासनापूर्ति शक्य नाहीं. तरी त्यांचा त्याग कां करायचा, हा प्रश्न उरतोच.

आधुनिक मानसशास्त्राच्या आधारें आपणांस याचा उलगडा होतो का तें पाहूं. वासना हा संदिग्ध शब्द आहे. मानवी जीवनाचे भाग दोन. शारीरिक आणि मानसिक. शारीरिक गरजांमध्यें भूक, तहान, उपभोग आदि जैविक गरजा येतील त्यांचा निग्रहपूर्वक उपशम करावा असें कोणतेंच तत्त्वज्ञान सांगत नाहीं. महात्माजींना सुद्धां हें मान्य नाहीं. देहभावनेपासून मुक्त करण्यासाठीं उगाच उपास तापास करणारांचीं त्यांनी कानउघाडणी केली आहे. ते म्हणतात–"शरीराला व्यर्थ कष्ट देण्यात मुळींच पुण्य नाहीं." नैसर्गिक प्रवृत्तीच्या दमनामुळें विकृति होण्याची भीति आहे. हा प्राकृतिक वाद्यांचा आक्षेप लागू होत नाहीं. कारण जैविक गरजांचें दमन करा असा महात्माजींचा आदेश नाहीं.

महात्माजींचे मतानुसार वंशवृद्धीसाठीं उपभोग ही गरज मुळींच विकृत नाहीं. परंतु त्याची विकृती मानसिक पातळीवर असल्यानें त्याचें विकृत स्वरूप जविक पातळीवर येतें. या विकृतींतूनच इतर विकृती निर्माण होतात. संतति-नियमनासंबंधीं एका पाश्चात्य विदुषीशीं बोलतांना महात्माजी म्हणतात–"पहा हें मानवाचें अधःपतन! पशूसुद्धां गर्भधारणा झाल्यावर संभोग करीत नाहींत. परंतु आम्ही विषयवासनेच्या आहारीं जाऊन गर्भधारणा झाल्यावर देखील संभोग करतों. हें नैसर्गिक आहे काय? नैसर्गिक असतें तर हें पशूंतही दिसून आलें असतें. आम्ही निसर्गाला विकृत स्वरूप देतों. 'खाण्यासाठीं जगा' असें नसून जगण्यासाठीं " खा " असें महात्माजी प्रतिपादन करतात. समतोल आहाराची ते सतत काळजी घेतात. जैविक गरजांचा निसर्गाला अनुरूप उपभोग घेण्यास महात्माजींचा मुळींच विरोध नाहीं.

आधुनिक मानसशास्त्र सांगतें:–राग, द्वेष, उपभोगलोलुपता ह्या जीवन विघटित करणाऱ्या शक्ति आहेत. ह्या विघटनांमधूनच मानवी जीवनांत अशांतता येते व त्यांतूनच विकृति निर्माण होते. भारतीय तत्त्वज्ञानाच्या भाषेंत याला अहंकार म्हटलें आहे. अहंकार म्हणजे व्यापक जीवनाला संकुचित करणारें तत्त्व. जीवनाला संकुचितता प्राप्त करणाऱ्या तत्वापासून आपणांस मुक्तता करून घ्यावयाची आहे. जीवनाला विशालता प्राप्त करून देणारें प्रेम हें तत्त्व आहे. जीवनाला यामुळें विशाल दृष्टिकोन प्राप्त होतो. जीवनांत सुसंगतीही त्यामुळें येते. भंगलेलें जीवन अभंग करणारी ती प्रेरणा आहे. त्या अभंगपणाच्या रसांत एकतानता निर्माण होते व त्या एकतानतेंतून जीवनांत शांति येते. यालाच आत्मदर्शन म्हणतात. माझें खरें स्वरूप व्यष्टि नसून समष्टि आहे, या जाणिवेंत जगणें हेंच मुक्त जीवन. महात्माजीनीं ही मुक्तीची कल्पना आपल्या आत्मकथेच्या उपसंहारांत लिहिलेली आहे. ते म्हणतात–"या चराचराला व्यापून उरलेल्या सत्यनारायणाची जीवनांत अनुभूति घेणें हाच आत्मसाक्षात्कार आहे."

उपनिषदांमध्यें ह्या स्थितीचें रूपकात्मक वर्णन आहे. या आनंदमय कोशामध्यें असलेल्या पक्षाचे पंख आहेत, नीती मुख आहे, वगैरे वगैरे. जीवनाचें तत्त्वज्ञान सांगणाऱ्या सर्व दर्शनांमध्यें तें भारतीय असो वा पाश्चात्य असो, प्रेमाला अगर अहिंसेला स्थान आहे.

मानवी जीवन म्हणजे फक्त उपभोगमय जीवन नाहीं. मानवी जीवनाचा एवढा सीमित अर्थ करणाऱ्यांचा 'साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः' असा महात्माजी उल्लेख करतात. ध्येयमग्न जीवन हेंच खरें मानवी जीवन होय. सर्व ध्येयांत 'आत्मसाक्षात्कार' हें अत्युच्च ध्येय होय. ह्या 'ध्येयाच्या पूर्तीतच जीवनसाफल्य आहे. अशा पुरुषाचें वर्णन 'आत्मकाम' ज्याच्या सर्व कामना पूर्ण झाल्या आहेत, असें केलें आहे. हीच जीवनाची समस्तपुरुषार्थसिद्धि होय.

**अहिंसा परमो धर्मः** असें स्मृति सांगते. धर्म या शब्दाचा भारतीय संस्कृतींत वैशिष्टयपूर्ण अर्थ आहे. धर्म म्हणजे धारण करणारें तत्त्व. जीवन ज्या एका तत्त्वामुळें पोषिलें जातें तें तत्त्व म्हणजे अहिंसा. प्रेम हा जीवनाचा स्थायी भाव आहे. जीवनाचें तत्त्व प्रेमच आहे. म्हणून महात्माजी म्हणतातः—"अहिंसा हा मानवी जीवनाचा धर्म आहे, मानवाला सत्याचें दर्शन अहिंसेच्या रूपांत होतें, प्रेमाच्या रूपांत होतें. अहिंसा व सत्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

मग महात्माजींनीं अगर इतर तत्त्वज्ञान्यांनी अहिंसेबद्दल प्रेम हा शब्द कां वापरला ? तर्कदृष्टया कोणतीही व्याख्या नकारात्मक असूं नये. नकारात्मक व्याख्या वस्तूच्या अभावात्मक स्वरूपाचा बोध करते. वस्तूच्या भावस्वरूपाचा बोध तीवरून होत नाहीं. त्यामुळें वस्तूच्या भावस्वरूपाविषयीं वाद अगर गैरसमज वाढतो. अहिंसा ही हिंसेचा अभाव दर्शविते. परंतु अहिंसेचें भावस्वरूप काय ?

महात्माजी म्हणतात— "अहिंसेचें भावरूप प्रेम हेंच होय." परंतु प्रेम हा शब्द विविध अर्थी वापरण्यांत आला आहे. व्यवहारांत आपण ज्याला प्रेम म्हणतों तें प्रेमाचें खरें स्वरूप नसून ती आसक्ति असते. विशुद्ध प्रेमाची अनुभूति विकारापासून मुक्तता झाल्यावर येते. महात्माजी म्हणतातः— "समस्त मानवी जीवन हें हिंसारूपी सर्पाच्या विळख्यांत अडकलेलें आहे. म्हणून हिंसेपासून मुक्त होण्याच्या साधनेवर भर दर्शविण्यासाठीं अहिंसा हा मूल्यात्मक शब्द वापरला आहे."

समष्टिजीवनाचा आदर्श साकार झालेलें जीवनच खऱ्या अर्थी मानवी जीवन होय. रागद्वेषादि विकार अगर अहंकार अशा जीवनाचा निषेध करतात. हीच खरी आत्महत्या अगर आत्म्याची हिंसा होय. अशा रीतीनें जीवनाचा निषेध करणाऱ्या हिंसेचा निषेध करण्यासाठीं जणूं काय अहिंसा शब्द वापरला असावा.

'**अहिंसा परमो धर्मः**' असें ज्या वेळेस म्हणतात, त्या वेळीं धर्म स्थिति-वाचक व गतिवाचक अशा दोन्हीही अर्थी वापरतात. '**अहिंसा परमो धर्मः**' म्हणजे प्रेम हा मानवी जीवनाचा धर्म आहे, अशा अर्थानें जेव्हां वापरतात तेव्हां तो स्थितिवाचक असतो परंतु धर्म ही जीवन बदलण्याची प्रक्रियाही आहे व त्या अर्थी तो गतिवाचकही आहे. म्हणून '**अहिंसा परमो धर्मः**' हा साधनरूप धर्मही आहे. जीवनामध्यें प्रचलित केलेल्या प्रेमाच्या प्रकाशांत सत्याचा शोध घ्यावयाचा आहे. रागद्वेषादि विकारांची काजळी दूर करून प्रेमाची ज्योत अधिक प्रकाशमान होईल आणि सत्य सुस्पष्ट दिसेल, असें करावयाचें आहे.

महात्माजी म्हणतात– "प्रेम, अहिंसा ही सृजनशील शक्ति आहे." त्या शक्तीच्या साहाय्यानें जीवन घडवायचें आहे. सृजनशील शक्तीचें वर्णन कार्य कारणसिद्धांताच्या ठोकळेबाजीनें करतां येत नाहीं. त्यामुळें अहिंसेबद्दल शंका विचारणाऱ्यांना ते म्हणतात, "सिद्धांत प्रतिसिद्धांताच्या जाळ्यांत न सांपडतां प्रेममय जीवन जगण्यास सुरवात करा म्हणजे तुमच्या शंकांचें आपोआप निरसन होईल." महात्माजी म्हणतात:–"डोळे मिटणें, नाम पुटपुटणें, अशी साधना ही यांत्रिक प्रक्रिया नाहीं. तर ती एक सृजनशील जीवन-प्रक्रिया आहे."

अहिंसा हा जीवनाचा सर्वार्थांनीं धर्म कसा आहे हें आपण पाहिलें; परंतु जीवनाला दोन दिशा आहेत. एक वैयक्तिक आणि दुसरी व्यापक. वैयक्तिक जीवन हें सापेक्षतेनें स्वयंचलित आहे. त्या स्वयंचलित घटकांमध्यें प्रक्रियेची एकता असते. त्यामुळें वैयक्तिक जीवन बदलण्याची प्रक्रिया सुलभ होते. ह्या जीवन बदलणाऱ्या प्रक्रियेमुळें '**अहिंसा परमो धर्मः**' आहे ह्याबाबत फारसा वाद नाहीं. मात्र ह्या धर्माला व्यापक प्रमाणावर बदल घडवून आणणारें तत्त्व म्हणून मर्यादा आहेत. महात्माजींनीं व्यापक प्रमाणावर बदल घडवून आणणारी प्रक्रिया म्हणून '**अहिंसा परमो धर्मः**' ह्या तत्त्वाचा अंगीकार केला, हेंच त्यांचें वैशिष्ट्य.

व्यष्टि व समष्टि असे जीवनाचे परस्पर विलग भाग आहेत, हें महात्माजींना मान्य नाहीं. त्याला त्यांचा विरोध आहे. हे अलग विभाग मानण्यास महात्माजींचा विरोध होता. कारण त्यामुळें नीतिनियमांच्या क्षेत्रांत सामाजिक आचरणाची नीति व वैयक्तिक आचरणाची नीति वेगळी, असा विपर्यास

करून मानवच मानवाची हिंसा करूं लागला. आपलें जीवन दांभिक बनवूं लागला. परंतु सृजनशील अहिंसा हेंच जीवनाचें सूत्र दोन्ही क्षेत्रांत मान्य करून अभ्यासाच्या सोयीसाठीं, असे अलग विभाग पाडले, तर तें महात्माजींच्या विचारसरणीशीं विसंगत होईल असें वाटत नाहीं.

समष्टिजीवनांतील अहिंसेचा विचार आपण दोन भागांत करूं. (१) अहिंसा आणि नीति. (२) अहिंसा आणि समाजव्यवस्था.

(१) **अहिंसा आणि नीति**— एखाद्या कृतीचें नैतिक मूल्यमापन करतांना दोन गोष्टींचा विचार नीतिशास्त्रांत येतोः—

(१) कर्त्याचा हेतु व (२) कृतीचे परिणाम.

शाश्वत नीतिमूल्य मानणारे, कृतीचें मूल्य ठरवितांना, कर्त्याच्या हेतूवर अधिक प्रमाणांत भर देतात. एखादी कृति हिंसक अगर अहिंसक हें कर्त्याच्या हेतूवर ठरत असतें. भावमय, वाङ्मय व द्रव्यमय असे हिंसेचे अगर अहिंसेचे तीन प्रकार जैनांनीं मानले आहेत. भावमय अहिंसा ही सर्वश्रेष्ठ व भावमय हिंसा सर्वतः दोषास्पद होय. कारण त्या दोन्ही कर्त्याच्या आंतरिक स्थितीच्या निदर्शक असतात. परिणाम हे तात्कालिक असतात. भाव हे सापेक्षतः दूरगामी असल्यामुळें परिणामांच्या दृष्टीनें त्यांचें महत्त्व अधिक. एखादी कृति हिंसक का अहिंसक ठरवितांना कर्त्याच्या हेतूवर महात्माजींचा भर होता. श्रीज्ञानदेवांनीं याची समर्पक व्याख्या केली आहे. ते म्हणतातः—

**जगाचिये सुखोद्देशें । कायावाचा मानसें ।**
**राहाटणें जें असे । तें अहिंसे रूप जाण ॥**

काया वाचा मानसें जगाच्या कल्याणार्थ केलेली कृति ती अहिंसा असें श्रीज्ञानदेव सांगतात. द्रव्यात्मक अनिवार्य हिंसा होत असेल, तर तिचा दोष कर्त्याला नाहीं.

**यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।**
**हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥** गीता, १८।१७

ह्या गीतेंतील श्लोकावर टीकेंत ज्ञानेश्वर म्हणतात, सर्व विश्वाशीं अद्वैत प्राप्त झालेल्या पुरुषांनीं समग्र विश्वाचा संहार केला तरी ती हिंसा होत नाहीं. तत्त्वतः या मताशीं महात्माजी सहमत आहेत. फक्त त्यांच्या सांगण्याच्या पद्धतींत फरक दिसतो. व्याधिग्रस्त वासराला इंजेक्शन देऊन दुःखांतून मुक्त

करण्यासाठीं गांधीजींनीं याच उपायांचा अवलंब केला. गांधीजी म्हणतात—देह असेतोंपर्यंत अहिंसेचें सर्वस्वी पालन अशक्य आहे. त्यामुळें कृतीच्या परिणामापेक्षां कर्त्याच्या हेतूवरून कृतीची हिंसा अगर अहिंसा ठरवावी. पण कल्याण कशांत आहे? कल्याण ह्या कल्पनेची संपूर्णतया नीतिशास्त्रीय व्याख्या करतां येत नाहीं. गरजेनुसार कल्याणाची कल्पना उपयुक्ततावादी बदलतात. सर्व उपयुक्ततावादी संधिसाधु असतात असें नाहीं. परंतु प्रत्येकाच्या कल्पनेंत फरक असण्याची शक्यता आहे. अशा वेळेस अंतःकरणातील विशुद्ध प्रेमाच्या ज्योतीची साक्ष घेऊनच कार्याकार्यविवेक करणें इष्ट ठरेल. कोणती कृति अहिंसक हें ठरवितांना गांधीजी गीतेंतील श्लोक उद्धृत करतात—

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।** ( १८-७८ )

या उपसंहारात्मक श्लोकावर भाष्य करतांना गांधीजी म्हणतातः—सर्वव्यापक असलेल्या सत्यरूपी कृष्णाची अंतर्यामांत साक्ष घेऊन केलेली कृति. दशवैका या जैन ग्रंथांत म्हटलें आहेः—विकारापासून मुक्ति झाल्यावर उत्पन्न होणाऱ्या ज्ञानानंतरच अहिंसेचें खरें पालन होतें. श्रीज्ञानदेव म्हणतात :—

**ज्ञाना मनाचिये भेटी । सरिसेंचि अहिंसेचें बिंब उठी ॥**

अखिल चराचर व्यापून राहिलेलें तत्त्व तेंच माझें खरें स्वरूप आहे, अशी अनुभूति आलेल्या पुरुषाची कृति हीच जणूं अहिंसेची व्याख्या होय !

द्रव्यात्मक अहिंसा टाळतां येणार नाहीं, म्हणून सर्वांनीं भावात्मक अहिंसेवरच भर दिला आहे. परंतु अशी हिंसा टाळतां येत नाहीं. सबब हिंसेचा आश्रय करण्यास महात्माजींचा सक्त विरोध आहे. अहिंसा हा धर्म आहे. धर्म ही जीवन बदलण्याची प्रक्रिया आहे. व्यक्तिजीवनांत धर्म हें केंद्र, आणि नीति हा परिघ आहे. जीवनांत धर्माचा व नीतीचा जो संबंध, तोच अहिंसेचा व नीतीचा होय.

( २ ) **अहिंसा व सामाजिक व्यवस्था**— टॉलस्टॉय म्हणतोः—ख्रिस्ताचें अहिंसेचें तत्त्वज्ञान लोकांना विसंगत वाटतें, कारण ख्रिस्तासारखें जीवन न जगतांच, ते त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करितात. स्वप्नांतील घटनांची सुसंगती जागृत अवस्थेंतील घटनेशीं लावतां येईल का? मुळींच नाहीं. कारण जीवनाच्या निरनिराळ्या अवस्थांतील त्या घटना आहेत. आक्षेपकांच्या व ख्रिस्ताच्या जीवनाच्या अवस्थेच्या त्या दोन भिन्न अवस्था

आहेत. त्यामुळें ख्रिस्ताच्या निरपवाद अहिंसेची चेष्टा तरी होते अगर तिला विकृत अर्थ लावतात.

अहिंसेचे पाठ महात्माजींना खालील घटनांतून मिळाले असें त्यांनीं सांगितलें आहे.

( १ ) शिक्षा करण्याची पात्रता असतांना महात्माजींच्या वडिलांनीं यातना सोसून त्यांना केलेली क्षमा हा पहिला पाठ म्हणतां येईल. त्याचा त्यांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. ( २ ) महात्माजी करीत असलेल्या अन्यायाचा मूक प्रतिकार कस्तुरबांनीं केला, तो पहिला आध्यात्मिक अगर नैतिक पाठ म्हणतां येईल. दुसऱ्या पाठाचें मात्र सामाजिक दृष्ट्या महत्त्व आहे. विभक्त न होतां आपआपसांतील होणाऱ्या अन्यायाचा अहिंसक मार्गांनीं प्रतिकार कसा करावा, याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. असहकाराच्या चळवळीचें स्वरूप कसें असावें, याचेंही तें उत्कृष्ट उदाहरण म्हणतां येतें. महात्माजी म्हणतात — "कुटुंबांतील व्यवहारांत जसें आपण वागतों, तसें जीवनाच्या सर्व व्यवहारांत आचरण ठेवणें, याचें नांव सत्याग्रह." "सत्याग्रह शब्द ध्येयाचा ध्रुवतारा तर अहिंसा ही ध्येयाप्रत नेणारी शक्ति आहे."

अहिंसा ही सृजनशील शक्ति आहे. तीमुळें हृदयपरिवर्तनाच्या तत्त्वावर त्यांचा विश्वास आहे. अहिंसक समाजाचें साचेबंद वर्णन करून अशा समाजनिर्मितीच्या पोथीबंद तत्त्वज्ञानापासून गांधीजींचा दृष्टिकोन भिन्न आहे. व्यक्तीच्या सृजनशीलतेवर गांधीजींचा विश्वास आहे. सृजनशील व्यक्ति हीच अहिंसक समाजाचा पाया आहे. सध्याची यंत्रप्रधान समाजव्यवस्था व्यक्तींच्या सृजनशीलतेला वाव देत नाहीं असें गांधीजींचें मत होतें. म्हणून ती समाजव्यवस्था बदलण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता. त्या वेळीं गांधीजींची विचारसरणी विक्षिप्त म्हणून तिची हेटाळणी झाली. परंतु पाश्चात्य विचारवंतांनाही आतां हळू हळू यंत्रप्रधान समाजव्यवस्थेचे दोष जाणवूं लागले आहेत. त्या समाजयंत्रणेंत व्यक्ति, माणूस म्हणून जगत नसून निर्जीव वस्तूसारखी फरफटत चाललेली आहे, ह्याची जाणीव होऊं लागली आहे. बाह्य शक्तीवर विजय मिळवून मानव अंतराळांत जाऊं लागला. परंतु आंतरिक शक्तीवर तेवढ्याच प्रमाणांत ताबा न मिळाल्यामुळें तो विजय त्याला भेडसावूं लागला आहे.

ज्या समाजांत व्यक्तीला मानव म्हणून जगतां येईल तो अहिंसक समाज, त्या समाजांत अन्याय दूर करण्याची पद्धतही अहिंसक राहील. अहिंसेच्या

शक्तीचें केंद्र व्यक्ति आहे. परकीय आक्रमणाचा अहिंसक मार्गांनी प्रतिकार कसा करावा हें सांगताना महात्माजी म्हणतात :—जो समाज अहिंसक असेल तोच अहिंसात्मक मार्गांनी परकी आक्रमणांचा प्रतिकार करूं शकेल. महात्माजी म्हणतात:—"अहिंसकाला प्रश्न नसतो. त्याचा स्वभाव असतो. स्वतः अहिंसक बनण्याचा प्रयत्न करा. हिंसेचा प्रतिकार आपोआप होईल" मानवाला जीवनाची अस्पष्ट झालेली उज्ज्वल दिशा दाखविण्याचा प्रयत्न महात्माजी करतात. अहिंसक समाजाचें चित्र रंगविण्यापेक्षां अहिंसात्मक जीवन जगण्यास सुरवात करा, असा त्यांचा संदेश आहे. तीच अहिंसक समाजव्यवस्था. कदाचित् ह्याला कोणी स्वप्नाळूपणा म्हणेल, पण आजचीं स्वप्नें उद्यांच्या जीवनाची चाहूल ठरतात. अहिंसक शक्ति सृजनशील असल्यानें तिला साच्यांत बसविण्याचा प्रयत्न हिंसात्मक आहे. महात्माजी म्हणतात:—"अहिंसा शिकवितां येत नाहीं. अहिंसेचें चित्र रंगवितां येत नाहीं. अहिंसेचें आचरण तेवढें करतां येईल. अहिंसा ही अनुभूतीचा विषय आहे. म्हणूनच **अहिंसा परमो धर्मः** आहे. स्वर्गांतील गंगा भगीरथानें धरणीवर आणली." आल्बर्ट श्वाईत्झर म्हणतो, "अहिंसेची दिव्य गंगा महात्माजींनी मानवसमाजाला प्राप्त करून दिली."

विश्वाला शांततेची आज अत्यंत जरूरी आहे. म्हणून लोक म्हणतात आम्हांला अहिंसेची आज अत्यंत जरूरी आहे. पण अशांततेचा उगम कशांत आहे हें जाणून न घेतां, ते शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. तो प्रयत्न अयशस्वी होतो. शांतता ही स्वतंत्र वस्तू नसून ती एका स्थितीची प्रभा आहे. ती स्थिती म्हणजे मानवी जीवनांतील सुसंवादित्व. तें सुसंवादित्व अहिंसेमुळेंच मानवी जीवनांत येणार आहे. प्रेम हें मानवी जीवनांत सुसंवाद निर्माण करणारें तत्त्व आहे. सुसंवादांतून शांति प्रकट होते. सध्याचे शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न मानवी जीवनांत सुसंवाद निर्माण न करतांच होत आहेत. असे वरवरचे प्रयत्न अल्पजीवी असतात. म्हणून प्रश्न पुन्हा भेडसावीत रहातो. समाजसंस्थांमध्यें बदल करण्याऐवजीं समाजाचा पाया जो मानव, त्यामध्यें बदल घडविणें हाच एक शाश्वत उपाय आहे.

'अहिंसा परमो धर्मः' ह्या महात्माजींच्या शिकवणुकीचें पालन हाच सध्यांच्या सर्व प्रश्नांवर उपाय म्हणून सांगतां येईल.

———×———

# सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी

## अध्यक्ष बाळासाहेब रेगे यांचें मननीय भाषण

सुवर्णमहोत्सवी समारंभाचे अध्यक्ष इंदूरचे माजी न्यायमूर्ती, श्रीसाईबाबांवर पराकाष्ठेची निष्ठा असलेले व त्यांच्या सहवासाचा लाभ ज्यानीं आठ वर्षे घेतला, असे श्री. बाळासाहेब रेगे यांचा थोडा फार परिचय साईलीलेच्या यापूर्वींच्या अंकांतून आमच्या वाचकांस करून देण्यांत आलेला आहेच.

शिरडी संस्थानतर्फें या महोत्सवानिमित्त श्री. पागे यानीं संपादित केलेल्या स्मरणिकेचें प्रकाशन जाहीर करून अध्यक्ष श्री. बाळासाहेब रेगे आपल्या भाषणांत म्हणाले, "माझे गुरुदेव श्रीसाईबाबा यांचें संपूर्णतया गुणवर्णन मी काय करू शकणार ? भगवंताचें वर्णन यथातथ्य कोणीं करू शकेल का ? तसंच आहे हें ! मला वाटतें प्रत्यक्ष वाग्देवी सरस्वतीसुद्धां ते वर्णन करू शकणार नाहीं. तेथें माझा काय पाड ! श्रीमती मणी साहकार यांचें गुरुदेवांच्या थोरवी सबंधीं झालेलें भाषण आपण नुकतेंच ऐकलें. त्यांच्यासंबंधीं आपण पुष्कळ वाचलें व अनुभविलेंही असेल. त्यापासून मिळेल तो बोध आपण घ्यावयाचा.


गुरुदेवांनी महासमाधि घेतल्यास पन्नास वर्षे झालीं. महाराष्ट्रीयांनीं अभिमान बाळगावा अशी ही घटना आहे. या महाराष्ट्रांत बाबांनीं आपलें कार्य केलें. महाराष्ट्रावर भगवंताची कृपादृष्टि आहे. देवावर, साधुसतांवर आपण श्रद्धा ठेविली पाहिजे. परंतु सध्यांचा काळ विपरीत आहे. सध्यां कोण कोणाला विचारीनासा झाला आहे. देवाला आणि संतांना लोकांनी गुंडाळून बाजूला ठेविलें आहे ! मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव या आज्ञा बाजूला ठेऊन आम्ही आजकाल वागूं लागलों आहोंत. आई वडिलांना व आचार्यांना आजचे शाळा कॉलेजांतील विद्यार्थी विचारीतनासे झाले आहेत ! हें लक्षण ठीक नाही असें मला वाटतें. छत्रपति शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांची आठवण

करा. गुरुकृपेनें राज्य मिळविलें तें समर्थांस अर्पण करण्यास शिवाजी महाराज तयार झाले ! केवढी त्यांची भक्ति व निष्ठा !

मद्रासमध्यें शिरडी संस्थानचे रिसिव्हर श्री.पाटणकर यांची तेथें भरलेल्या साईभक्त संमेलनांत भेट झाली तेव्हां त्यांनी या सुवर्णमहोत्सवाची मला कल्पना देऊन येथें येण्याचें आमंत्रणहि दिलें होतें. ''

यानंतर नुकतेच दिवंगत झालेले राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज यांच्या निधनाबद्दल व त्यांच्या जीवनकार्याबद्दल भावस्पर्शी उद्गार काढून त्यांच्या-

## सुवर्ण महोत्सव समारोप समारंभ



डावीकडून:-(१) श्री. द. दि. पाटणकर, (२) श्री. व्ही. एस्. पागे (३) श्री. टी. एस्. भारदे (४) श्री. पी. के. सावंत (५) श्री. एस्. के. वानखेडे (६) समारंभअध्यक्ष-श्री बाळासाहेब रेगे व (७) श्रीमती मणी साहुकार ( भाषण करीत असतां )

संबंधीच्या आपल्या कांहीं व्यक्तिगत आठवणी सांगून श्री. बाळासाहेब पुढें आपल्या भाषणांत म्हणाले, " मला आठवतें कीं, १९१० सालीं मी साईबाबांच्या दर्शनासाठीं शिरडीस गेलों तेव्हांपासून त्यांची कृपादृष्टि माझ्याकडे वळली. त्यानीं

मला त्याकाळीं शिरडींत असलेल्या श्री. राधाकृष्ण आई यांच्याकडे पाठविलें व " त्या तुला काय तें सांगतील. ती माझी आई आहे तशीच तूंही तिला आपली आई मान. " तसेंच त्यानीं कोणाशीं मिसळू नये व प्रकाशांत येण्याचें टाळावें. एकाच ठिकाणीं निष्ठा ठेवावी असेंही सांगितलें. त्यानंतर मी शिरडीस वेळोवेळीं जात असे; परंतु मी माझा संबंध कोणाशीं येऊं दिला नाहीं व स्वतःचा गाजा-वाजाही होऊं दिला नाहीं. गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणें वागत गेलों. तोंडाला कुलूप घालून वर्षेंच्या वर्षें राहिलों. "

यानंतर साईबाबांचे एकनिष्ठ मद्रासी भक्त बॅ. नरसिंह स्वामी यांचा व आपला संबंध कसा आला व त्याचें पर्यवसान एकमेकाचे गुरुबंधु होण्यांत कसकसें होत गेलें यासंबंधींच्या आपल्या आठवणी सांगून ( आक्टोबर साईलीला विषेषांकांतील लेखांत त्या आल्या आहेत. ) श्री. बाळा-साहेब म्हणाले, ' नरसिंहस्वामी यांची मला या प्रसंगीं व नेहमींच आठवण होत असते. गुरुदेवांसंबंधींचा त्यांचा भक्तिभाव अनन्यसाधारण होता. त्यांच्या भक्तीचें लोण त्यांनीं मद्रासभर पोह्होंचविलें. त्यांच्या कार्याची तुलना करतां येणार नाहीं. '

ऐन तारुण्यांत वयाच्या बाविसाव्या वर्षापासून साईबाबांशी माझा निकट संबंध आला. त्यांच्याकडे जाऊन कोणाला काय तर कोणाला काय मागायचें असतें. मला तसें त्यांच्यापाशीं कांहीं मागायचें नव्हतें. त्यांच्यापाशीं माझें मागणें असलें तर तें एकच असे. कोणतें ? तुम्हीं माझ्यासन्निध नेहमीं असावें, तुमचा विसर मला कधींही न पडो. याच जन्मीं नव्हे तर पुढच्याही जन्मीं. साईबाबांकडे जाण्याची प्रेरणा मला कशी झाली सांगतां येत नाहीं परंतु ती मी देवकृपा समजतों. साईबाबांच्या शिकवणुकीसंबंधानें काय सांगायचें ? त्यानीं कधीं प्रवचनें दिलीं नाहींत. साध्या साध्या गोष्टी सांगून त्या मार्गानें आपल्या भक्तांना ते अत्यंत जीवनोपयोगी शिक्षण देत असत. लोकांचें त्यामुळें समाधान होत असे. जो जो आपलें स्मरण करील किंवा आपल्याजवळ येईल त्याचें दुःख दूर करणें हें आपलें परम कर्तव्य ते समजत असत. कित्येक वेळां दुसऱ्यांचें दुःख स्वतःवर ओढवून घेऊन त्यांनीं आपल्या भक्तांना दुःखमुक्त केलें आहे.

यानंतर श्री. बाळासाहेब रेगे श्रीसाईबाबा फाऊंडेशनकडे वळून व त्याची स्थापना होत असल्याचें जाहीर करून म्हणाले, ' सध्यांच्या काळांत साईबाबा लोककल्याण साधण्याच्या दृष्टीनें ज्या ज्या कार्याकडे वळले, अशी त्यांचीं शैक्षणिक, धार्मिक, आरोग्यविषयक व आर्थिक उन्नतीचीं कार्यें पार पाडण्यासाठीं श्रीसाईबाबा फाऊंडेशनची अत्यंत जरूरी आहे. या सुवर्णमहोत्सव प्रसंगीं जरूर व योग्य अशी ही लोककल्याणकारी संघटना जन्मास येत आहे. मी तिचें स्वागत अंतःकरणपूर्वक करतों व तिला घवघवीत सुयश चिंतितों. या कार्यामागें गुरुदेवांचें भगवंताचें अधिष्ठान आहे असें आपण समजावें. हें गुरुदेवांचेंच कार्य आहे, तेव्हां त्याला शक्य त्या परीनें हातभार लावणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. त्यामुळें गुरुदेवांचें आवडतें कार्य उत्साहपूर्वक पुढें चालू राहणार आहे. माझी खात्री आहे कीं तेच आपल्या भक्तांना जरूर ती प्रेरणा देऊन त्यांच्याकडून हें कार्य करवून घेतील. आपण कोणतेंही प्रदर्शन करण्याची जरुरी नाहीं. जें सत्कार्य आहे, जें बाबांचेंच कार्य आहे त्याचें प्रदर्शन नको. त्यांचें तें कार्य ते आपल्या प्रिय भक्तांकडून पार पाडवून घेतील अशी माझी श्रद्धा आहे. आपण श्रद्धा बाळगा, सद्‌बुद्धीनें घ्या व विश्वप्रेम अंतःकरणांत असूं द्या. आपलें उद्दिष्ट फार चांगलें आहे. तें साध्य झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

याप्रसगीं मी गुरुदेवांपाशीं अनन्यभावें अशी प्रार्थना करतों कीं, गुरुदेव ! आपला संपूर्ण आशीर्वाद या कार्याला असूं द्या. यांत आम्हांला संपूर्ण यश द्या. हें तुमचेंच कार्य आहे तें आमच्याकडून पार पाडवून घ्या. त्यासाठी जरूर ती शक्ति नि उत्साह आम्हांला द्या."

# सुवर्णमहोत्सवी प्रकाशनें.

## परिचयाची परडी

श्रीसाई बाबांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीनिमित्त श्रीसाईलीला मासिकाचा विशेषांक प्रसिद्ध करण्यांत आला तो आमच्या वाचकांपुढें आहेच. त्याचा परिचय करून देण्याची जरूरी नाहीं. परंतु त्याशिवाय त्या महोत्सवानिमित्त कांहीं लहानमोठीं परंतु साईभक्तांच्या दृष्टीनें महत्वाचीं अशीं कांहीं प्रकाशनें शिरडी संस्थानतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलीं. त्यांचा थोडक्यांत परिचय करून देण्यांत येत आहे.

(१) **श्रीसाईसंस्मरणः**—सपादक श्री वि. स. पागे. या पुस्तिकेंत इंग्रजी व मराठी असे दोन विभाग ठेवण्यांत आले असून इंग्रजी विभागांत श्रीमती मणी साहुकार, बी. पी. बहिरट एम्. ए. डॉ. बी. एन्. पडित पंडितराज एम्. आर. गोपालाचार्य एम्. ए., व्ही. आर. तळाशीकर पी. जे. चिमुलगुंद आय. सी. एस्. वगैरे लेखकांचे वाचनीय व विचारप्रवर्तक लेख आले आहेत.

मराठी विभागांत श्री. वि. स. पागे, लक्ष्मीकान्त भास्करराव मंत्री, काकासाहेब कालेलकर, डॉ. शं. दा. पेंडसे, स्वामी मुक्तानंद परमहंस (गणेशपुरी) व डॉ. प्रा. मो. दि. पराडकर एम्. ए. पी. एच. डी. यांचे विद्वत्ताप्रचुर व विविध विषयांवरील लेख आले आहेत.

याशिवाय निरनिराळ्या भाषांत साईबाबांसंबंधीं जें वाङ्मय आजवर प्रसिद्ध झालें त्याची भाषावार माहिती करून देण्यांत आली आहे, ती अत्यंत उद्‌बोधक तशीच मार्गदर्शक होऊन रहाणारी आहे.

**पुण्यतिथी स्मरणिका**—संपादक—वि. स.पागे. स्मरणिकेत सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी उत्सवाचा समग्र कार्यक्रम देण्यांत आला असून बाबांच्या जीवनांतील महत्वाच्या प्रसंगावर रेखाटलेलीं कांहीं रंगीत चित्रेंही देण्यांत आलीं आहेत.

शिवाय श्रीसाई शरण आनंद देवता सुब्बाराव, डॉ. दमयंती डुंगरसी एम्. एल्‌एल्. बी. पी. एच्. डी.; एन्. एम्. कामटे, ए. व्ही.के. चारी, जी. बी. देशपांडे, त्रिभुवन तिवारी एम्. ए. एलएल. बी., हिरालाल शहा. एन. यू. थवानी यांचे विविध विषयांवरील व विशेषतः बाबांचें जीवन रहस्य सांगणारे लेख व त्यांच्या संबंधींचे अनुभव ( इंग्रजींत ) प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

**सचित्रसाईबाबा**—अंतर्बाह्य सुंदर असा श्रीसाईबाबांच्या जीवनांतील पंधरा निवडक प्रसंगांवर आधारलेल्या रंगीत व सुंदर चित्रांचा हा एक संग्राह्य आल्बम् आहे. प्रत्येक साईभक्तानें तो जवळ बाळगावा इतकें त्याचें महत्त्व आहे. किंमत अवघा सव्वा रुपया. प्रत्येक चित्रावर प्रसंगानुकूल एक एक ओवी देण्यांत आली असून, श्रीमती मणी साहुकार यानीं केलेलें इंग्रजी रूपांतर प्रत्येक चित्राखालीं देण्यांत आलें आहे. मुंबईतील महोत्सवप्रसंगीं असंख्य भक्तांनीं या आल्बमच्या प्रती विकत घेतल्या. यावरून त्याची उपयुक्तता नि लोकप्रियता

**४ विश्वदर्शन**—लेखक–वि. स. पागे. दिग्दर्शक वसंत देसाई. श्री. वि. स. पागे यांचा संतवाङ्मयाचा अभ्यास दांडगा तसाच डोळस आहे. सुवर्ण-महोत्सव प्रसंगीं सेंट झेविअर कॉलेज जिमखान्यावर जे संगीत, भजन, नृत्यादि विविध मनोवेधक कार्यक्रम झाले, त्यापैकींच विश्वदर्शन हा एक कार्यक्रम होता.

त्या कार्यक्रमाची एक बत्तीस पानी पुस्तीका स्वतंत्रपणें व श्रीसाई संस्मरणिकेंतूही प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

श्री. पागे या पुस्तिकेच्या प्रस्तावनेत म्हणतात—"महाराष्ट्रीय संतांचें काव्य म्हणजे एक महासागर आहे. मात्र तो क्षारोदधि नसून क्षीरोदधि आहे. त्याचें वर्णन करून सांगतां यावयाचें नाहीं ....संतांचे अभंग पुष्कळ आहेत. त्यांचे निरनिराळे ग्रंथ आहेत. त्यांतील निवडक भाग नजरेसमोर ठेऊन त्यावर विशेष प्रकाशझोत टाकून वाचकांचें मन त्यावर जडविणें हें तंत्र येथें अवलंबिलें आहे. त्यांतील स्पष्ट व गूढ अर्थ संगीताच्या संवादाच्या व नृत्य-नाट्याच्या आधारें व्यक्त करून दाखविण्याची ही पद्धत नवी आहे.

यांत मधून मधून संतांचे अभंग, ओंव्या, त्यांचें संवादाच्या रूपानें स्पष्टी-करण करण्यांत आलें आहे. या कार्यक्रमाचें परिणामकारक दिग्दर्शन वसंत देसाई यांनीं अत्यंत प्रभावीपणें व उठावदारपणें केलें आहे. अनेक नामवंत अभिनयकुशल सहकाऱ्यांनीं त्यांना सहकार दिला.

ही पुस्तिका नुकतेच दिवंगत झालेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीला संपादकाकडून अर्पण करण्यांत आली आहे.

**( ५ ) सामरस्यं स्वराज्यं**—सम्पादक एम्. आर. गोपालाचार्य एम्. ए. मुंबईतील सुवर्ण महोत्सवी उत्सवांत रोज सायंकाळीं विद्वान पंडितांची प्रवचनें व कीर्तनें होत असत. प्राचार्य एम्. आर. गोपालाचार्य यांचें त्या कार्य-क्रमांत एक प्रवचन झालें. त्यांच्या प्रवचनाचा विषय होता 'सामरस्य स्वराज्यम्' आमचे वेद म्हणजे चिरतन काळाला पुरून उरणारें, दैवी वाङ्मय आहे. हजारो वर्षांपूर्वी त्यांची रचना झाली असली तरी आजच्या काळालाही वेदमंत्र लागू पडणारे व आजच्या काळांतही मार्गदर्शन करण्यास समर्थ असे आहेत. प्रा. गोपालाचार्य यानीं ऋग्वेदांतील आठ निवडक मंत्र घेऊन आपल्या प्रवचनांत त्यांचें इंग्रजींत स्पष्टीकरण केलें. आणि त्याच प्रवचनाची ही छोटी पुस्तिका आ

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**–by Pradhan | | | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** (Telgu) | | | १-०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | **साईबाबा–अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. थोंड | २-०० |
| (१०) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | **Guide to Shirdi** (English) | | | ००-१२ |
| (१८) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00-37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00-50 |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14